- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संपादक : सुनील कुहीकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, २८ मार्च २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ११३ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,४८,७०० /-
- २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- चांदी : २,३८,३००/-

**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# चाकणकरांनी प्रदेशाध्यक्षपदही सोडले

## भोंदूबाबा खरातला गुरू मानणे भोवले, निष्पक्ष चौकशीची मागणी

**वृत्तसंस्था, मुंबई**
अशोक खरात प्रकरणी रुपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदानंतर राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. खरातला गुरू मानणाऱ्या रुपाली चाकणकरांवर महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा, यासाठी दबाव होता. आता त्यांनी या पदाचा राजीनामा दिला. या संपूर्ण प्रकरणात निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी आपली मागणी असल्याचे रुपाली चाकणकर यांनी म्हटले. खरात प्रकरणी आपण आधीच भूमिका स्पष्ट केली आहे. त्याच्याशी संबंधित कोणत्याही आर्थिक व्यवहारात किंवा गैरकृत्यात आपला दुरान्वयेही संबंध नाही. पोलिस तपासात या गोष्टी समोर येतीलच. हा तपास पारदर्शकपणे आणि निष्पक्षपणे व्हावा, अशी मागणी आपण मुख्यमंत्री,



उपमुख्यमंत्री आणि पोलिस महासंचालकांकडे केली आहे, असे रुपाली चाकणकरांनी म्हटले.

शेकडो महिलांचे लैंगिक शोषण केल्या प्रकरणी अशोक खरातवर कारवाई झाली. अशोक खरातसोबत रुपाली चाकणकरांचे काही फोटो व्हायरल झाल्यानंतर चाकणकरांवर टीका होऊ लागली. चाकणकर या अशोक खरातला गुरू मानायच्या, त्यामुळे या आधीच्या काही प्रकरणात चाकणकरांनी राजकीय हस्तक्षेप केल्याचे समोर आले होते.

अशोक खरात प्रकरणी रुपाली चाकणकरांनी राजीनामा द्यावा, यासाठी विरोधी पक्षांनी दबाव वाढवला. तसेच राष्ट्रवादीतील एका गटानेही ही मागणी केल्याची माहिती समोर आली. त्यानंतर आधी रुपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर आता राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा दिला.

**चाकणकर यांच्या अडचणी वाढणार**

रुपाली चाकणकर या अशोक खरातच्या शिवनिका ट्रस्टच्या संचालिका होत्या. खरात प्रकरणी जे कुणी दोषी असतील, अशोक खरातशी ज्यांचे कुणाचे संबंध असतील, त्यांना सोडणार नाही असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला होता. तसेच शिवनिका ट्रस्टच्या संचालकांचीही चौकशी केली जाणार आहे. त्यामुळे चाकणकर यांचीही चौकशी होऊ शकते.

**थोडक्यात**

### खरात चौकशीच्या चक्रव्युहात

**नाशिक :** भोंदू अशोक खरातचे कोट्यवधीचे आर्थिक उद्योग बघता आता त्याच्या मागे ईडी, विदेशी चलन (फॉरेक्स) आणि कस्टमचाही ससेमिरा लागण्याची चिन्हे आहेत. खरातच्या व्यवहाराची कागदपत्रे आता सक्तवसुली संचालनालयाकडे (ईडी) देण्यात येणार असल्याचे समजते. तसेच त्याच्या विदेश दौऱ्यांची व विदेशी चलन व्यवहारांची फॉरेक्सकडून चौकशी होणार आहे, तर दुसरीकडे त्याने तुर्कस्तानमधून आणलेल्या फर्निचरप्रमाणेच मोठ्या प्रमाणावर विदेशातून आणलेल्या अन्य साहित्यावर कस्टम ड्युटी भरली किंवा नाही याचीही तपासणी करण्यात येणार असल्याचे वृत्त आहे. भोंदू खरातचे एकेक कारनामे उघड होत असून, महिलांच्या शोषणापलीकडे आर्थिक फसवणूक, खंडणी असे प्रकारदेखील समोर येत आहेत. काही तक्रारीत याचा ऊहापोह झाला असला तरी त्याच्या स्थावर-जंगम मालमत्तांमधील तरतूद, गुंतवणूक तसेच अन्य आर्थिक व्यवहार बघता ही अचंबित करणारी खरात फाइल्स श्रीमंती तक्रारीच्या रूपाने बाहेर पडत आहे. नाशिक आणि नगर मिळून ५२ मिळकतींची माहिती आहे. काही ठिकाणी तो स्वतः मिळकतीचा मालक आहे, तर कुटुंबासह भागीदारीत जमिनी आहेत. दुर्मीळ भासणारे बनावट खडे, रत्न, पॉलिश केलेले चिंचोके, बनावट मध विकून मिळवलेली माया आता चौकशीला पात्र ठरली आहे. हा आकडा प्रचंड मोठा असल्याने आयकर विभागापाठोपाठ पोलिसांकडून सक्त वसुली संचालनालयाला देखील कागदपत्रे देण्यात येणार आहेत. तसेच पुण्यातील बांधकाम व्यावसायिक राजेंद्र जासूद यांनी बुधवारी (दि. २५) रात्री नाशिक पोलिसांकडे तक्रार केली.

# भाजप-काँग्रेस आमदारांमध्ये हाणामारी



**वृत्तसंस्था, श्रीनगर**
जम्मू-काश्मीर विधानसभेत शुक्रवारी इराणचे माजी सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधनावरून निदर्शने झाली. नॅशनल कॉन्फरन्सचे नेते खामेनी यांचा फोटो घेऊन सभागृहात पोहोचले आणि त्यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली. नॅशनल कॉन्फरन्सच्या नेत्यांनी खामेनी यांचे पोस्टरही फडकवले. दरम्यान, सभागृहात काँग्रेस आणि भाजप नेत्यांमध्ये धक्काबुक्की झाल्याचा व्हीडीओही समोर आला. तथापि, हा वाद भाजप नेत्यांनी राहुल गांधींवर केलेल्या टिप्पणीवरून झाला होता. काँग्रेस आमदार इरफान हाफिज पंतप्रधान नरेंद्र मोदींविरोधात घोषणाबाजी करत होते.

प्रत्युत्तरादाखल भाजप आमदार युद्धवीर सेठी म्हणाले, राहुल गांधी पप्पू आहेत. यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये हाणामारी सुरू झाली. तर, इराण युद्धावर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले इराणवर हे युद्ध लादले गेले. मानवतेची हत्या झाली आहे. नॅशनल कॉन्फरन्सचे आमदार तन्वीर सादिक म्हणाले, आम्ही इराणसोबत उभे आहोत.

आमचा पक्ष आणि जम्मू-काश्मीर सरकार त्यांच्यासोबत उभे आहे. जसे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी मागील वेळी नागरी समाजात अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येचा निषेध केला होता. त्याचप्रमाणे, आज आम्ही सर्वजण येथे उभे आहोत. आम्ही समजतो की ज्या पद्धतीने खामेनी यांना मारण्यात आले, कोणत्याही देशाला दुसऱ्या देशावर हल्ला करण्याचा कोणताही हक्क नाही. मला वाटते की, देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाने याचा निषेध केला पाहिजे. आम्ही इराणच्या लोकांना पाठिंबा देत आहोत.

# विजेचे दर कमी होणार

## पूर्वीच्या निर्णयावर वीज नियामक आयोगाचे शिक्कामोर्तब, स्मार्ट मीटर घेणाऱ्यांना जास्त सवलत

**वृत्तसंस्था, मुंबई**
उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वीज दर निश्चितीबाबत फेरसुनावणी घेऊन राज्य वीज नियामक आयोगाने आपल्या पूर्वीच्याच निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे. पुढील ५ वर्षात सर्वच प्रवगार्तील ग्राहकांना पुरवण्यात येणा-या विजेचे दर टप्प्याटप्प्याने कमी होणार असून, याची सुरुवात १ एप्रिलपासून होणार आहे. स्मार्ट मीटर असलेल्या ग्राहकांना दिवसा विजेच्या दरात सवलत मिळणार आहे.

राज्य वीज दर नियामक आयोगाने २०२५ ते २०३० या ५ वर्षासाठी विजेचे दर मागच्या वर्षी मार्च महिन्यात निश्चित करून दिले होते. मात्र, या निर्णयाला आव्हान देऊन पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली. त्यावरही आयोगाने जून महिन्यात आपला निर्णय दिला. या निर्णयाला पुढे मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. महावितरणची बाजू ऐकून घेण्यात आली नाही म्हणून उच्च न्यायालयाने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वावर बोट ठेवले व जूनचा आदेश रद्द केला होता. सर्वोच्च न्यायालयानेही उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. त्यामुळे राज्य विद्युत नियामक आयोगाने महावितरणच्या पुनर्विचार याचिकेवर पुन्हा जनसुनावणी घेतली. नैसर्गिक न्याय तत्त्वाचे पालन करून व सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करून आज आपला निर्णय जाहीर केला. वीज दर कपातीबाबतच्या आधीच्या निर्णयावर आयोगाने शिक्कामोर्तब केले.

१०० ते ३०० युनिट वापर असलेल्या ग्राहकांसाठीचा दर १३ रुपये १७ पैशावरून कमी होऊन १२ रुपये ९४ पैसे होईल. उच्च दाब औद्योगिक ग्राहकांसाठीचा दर १० रुपये ७७ पैसे प्रती युनिटवरून कमी होऊन १० रुपये ७१ पैसे इतका होईल. याशिवाय स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती वीज ग्राहकांना सकाळी ९ ते दुपारी ५ या कालावधीतील वापरासाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत मिळेल. उद्योगांना व व्यावसायिक वीज ग्राहकांना सकाळी ८ ते दुपारी ५ या कालावधीतील वीज वापरासाठीची टीओडी सवलत चालूच राहणार आहे. या ग्राहकांना वीज दरात एप्रिल ते सप्टेंबर महिन्यात १५ टक्के तर ऑक्टोबर ते मार्च महिन्यात २५ टक्के सवलत मिळणार आहे.

**२०३० पर्यंत विजेचे दर टप्प्याटप्प्याने कमी होणार**

आयोगाच्या निर्णयानुसार घरगुती, औद्योगिक, वाणिज्यिक अशा सर्व प्रवर्गातील ग्राहकांसाठीचे विजचे दर २०३० पर्यंत टप्प्याटप्प्याने कमी होणार आहेत. कोणत्याही प्रवर्गात वीज दर वाढणार नाहीत. १ एप्रिल २०२६ पासून नवीन दराची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणार आहे. दरमहा १०० युनिटपर्यंत वीज वापर असलेल्या ग्राहकांसाठीचा सध्याचा ७ रुपये ३१ पैसे हा दर कमी होऊन ७ रुपये १० पैसे होईल. पुढील ५ वर्षात वीज दर २६ टक्क्यांनी कमी होणार आहे.

# देशात एलपीजी उत्पादन ४० टक्क्यांनी वाढले

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
शुक्रवारी सरकारने स्पष्ट केले की, देशातील सर्व तेलशुद्धीकरण प्रकल्प (रिफायनरीज) १००% क्षमतेने कार्यरत आहेत. देशांतर्गत एलपीजी उत्पादनात ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. सध्या देशात लॉकडाऊनसारखी कोणतीही परिस्थिती नाही. १४ मार्चपासून आतापर्यंत ३०,००० व्यावसायिक एलपीजी सिलिंडर्सचा पुरवठा करण्यात आला आहे. यामध्ये रेस्टॉरंट्स आणि ढाब्यांना प्राधान्य देण्यात आले आहे.

एका पत्रकार परिषदेदरम्यान, पेट्रोलियम मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी माहिती दिली की, आपल्या एलपीजी पुरवठ्यापैकी ९०% पुरवठा स्ट्रेट ऑफ होर्मुझ मार्गे केला जातो. स्थलांतरित मजुरांना अंदाजे ३०,००० एलपीजी सिलिंडर्स पुरवण्यात आले आहेत.

आपल्याकडे कच्च्या तेलाचा, तसेच पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. एलपीजीचा पुरवठा सुरळीतपणे सुरू ठेवण्यात आला आहे. पेट्रोल पंपांवर दिसून येणारी गर्दी ही केवळ अफवांमुळे निर्माण झालेली परिस्थिती आहे.

दरम्यान, मध्यपूवेर्तील संघर्षावर लक्ष ठेवण्यासाठी केंद्र सरकारने संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे. या समितीत गृहमंत्री अमित शाह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्यासह इतर मंत्र्यांचा समावेश आहे.

# देशात लॉकडाउन लागणार नाही!

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील संकटामुळे देशात देशव्यापी लॉकडाऊन लागू केला जाणार नाही, असे केंद्र सरकारने शुक्रवारी स्पष्ट केले. सरकारचे तीन वरिष्ठ मंत्री निर्मला सीतारामन, किरण रिजिजू आणि हरदीप पुरी यांनी निवेदने जारी करून या केवळ अफवा असल्याचे स्पष्ट केले. परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असल्याचे रिजिजू यांनी नमूद केले आणि खुद्द पंतप्रधान मोदी स्वतः या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याचेही त्यांनी सांगितले.



पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनीही जनतेला घाबराट निर्माण न करण्याचे आवाहन केले आणि लॉकडाऊन लागू करण्याचा सरकारचा कोणताही इरादा नसल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित केले. वास्तविक पाहता, चार दिवसांपूर्वी संसदेत पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या एका विधानानंतर लॉकडाऊनबाबतच्या अफवा पसरण्यास सुरुवात झाली होती. सध्या सुरू असलेल्या संघषार्मुळे निर्माण झालेल्या कठीण जागतिक परिस्थितीचा परिणाम दीर्घकाळ टिकण्याची शक्यता आहे असे त्यांनी म्हटले होते. अशा प्रकारच्या आव्हानांचा सामना देशाने यापूवीर्ही, अगदी कोविड-१९ महामारीच्या काळातही, एकजुटीने आणि एकोप्याने केला आहे, असेही त्यांनी पुढे नमूद केले. आज संध्याकाळी पंतप्रधान सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचेही नियोजित आहे.

**केवळ अफवा : रिजिजू**

संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू यांनी स्पष्ट केले, या सर्व अफवा कोण पसरवत आहे? पंतप्रधानांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, घाबरण्याची काहीही गरज नाही. साठेबाजांना (होर्डर्सना) इशारे देण्यात आले आहेत आणि राज्य सरकारांना साठेबाजी होणार नाही याची खात्री करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संपूर्ण परिस्थिती भारत सरकारच्या पूर्णपणे नियंत्रणात आहे. सर्वसामान्य जनतेला कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये यासाठी, अगदी सर्वोच्च स्तरापासून ते तळागाळापर्यंत, प्रत्येक पातळीवर देखरेख केली जात आहे; खुद्द पंतप्रधानही स्वतः या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

**अनावश्यक भीतीचे वातावरण : हरदीप पुरी**

पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी नमूद केले की, लॉकडाऊनबाबत पसरणाऱ्या अफवा पूर्णपणे खोट्या आहेत. मला हे स्पष्ट करायचे आहे की, सध्या सरकारी पातळीवर अशा कोणत्याही प्रस्तावाचा विचार सुरू नाही. अशा वेळी, आपण सर्वांनी शांत, जबाबदार आणि एकजूट राहणे अत्यंत आवश्यक आहे. अशा परिस्थितीत अफवा पसरवणे आणि अनावश्यक भीतीचे वातावरण निर्माण करणे हे बेजबाबदारपणाचे लक्षण आहे.

# अवघ्या ३५ वर्षीय बालेन शाहांनी नेपाळ पंतप्रधानपदाची शपथ घेतली!

**वृत्तसंस्था, नेपाळ**
बलेंद्र (बालेन) शाह यांनी नेपाळचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. वयाच्या ३५ व्या वर्षी, बालेन हे देशाचे सर्वात तरुण पंतप्रधान बनले आहेत. खासदार म्हणून शपथ घेण्याच्या काही तास आधी, त्यांनी एका रॅप गाण्याच्या माध्यमातून आपला पहिला संदेश दिला, ज्यामध्ये त्यांनी भ्रष्टाचार, व्यवस्थेतील बदल आणि तरुणाई या विषयांवर भाष्य केले. आपल्या गाण्यात त्यांनी म्हटले आहे की, एकता हीच त्यांची सर्वात मोठी ताकद आहे आणि यावेळी इतिहास घडत आहे. बालेन यांच्या राष्ट्रीय



स्वतंत्र पक्षाने (आरएसपी) ५ मार्च रोजी झालेल्या निवडणुका जिंकल्या. कार्यवाहक पंतप्रधान सुशीला कार्की यांनी म्हटले आहे की, देशाचे भविष्य आता तरुणांच्या हातात आहे आणि नवीन सरकार भ्रष्टाचार संपवेल अशी अपेक्षा आहे.

**सुधन गुरुंग यांची गृहमंत्री म्हणून नियुक्ती**

मंत्रिमंडळ स्थापनेची प्रक्रियाही सुरू झाली आहे. सुधन गुरुंग यांची गृहमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्यावर अंतर्गत सुरक्षा आणि कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी असेल. शिशिर खनाल यांची परराष्ट्र मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, ते नेपाळचे राजनैतिक धोरण आणि आंतरराष्ट्रीय संबंध सांभाळतील.

**बालेन मधेसीतून पहिले पंतप्रधान**

बालेन यापूर्वी काठमांडूचे महापौर होते. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये त्यांनी पदाचा राजीनामा दिला आणि राष्ट्रीय स्वतंत्र पक्षात प्रवेश केला. बालेन हे मधेस प्रदेशातील पहिले पंतप्रधान ठरले आहेत. मधेस प्रदेश हा नेपाळचा एक भाग आहे जो देशाच्या दक्षिण भागात भारताच्या सीमेला लागून पसरलेला आहे. तो तराई प्रदेश म्हणूनही ओळखला जातो. येथे राहणाऱ्या लोकांना मधेसी म्हणून ओळखले जाते. नेपाळी राजकारणात प्रतिनिधित्व आणि अस्मितेवरून हा प्रदेश बऱ्याच काळापासून चर्चेचा केंद्रबिंदू राहिला आहे आणि राजकीय संतुलनाच्या दृष्टिकोनातून बालेन यांची पंतप्रधान म्हणून निवड महत्त्वपूर्ण मानली जाते.

नेपाळमध्ये सामान्यतः आघाडी सरकारे स्थापन केली जातात, जिथे दोन किंवा अधिक पक्ष मिळून बहुमत तयार करतात. नेपाळमधील मागील निवडणुकांमध्ये, नेपाळी काँग्रेस आणि नेपाळ कम्युनिस्ट पार्टी (संयुक्त मार्क्सवादी-लेनिनवादी) यांच्यात मुख्य लढत होती. मात्र, यावेळी परिस्थिती बदलली. रवी लामिछाने यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाने (आरएसपी) स्वबळावर बहुमत मिळवले. २०२२ मध्ये चौथा सर्वात मोठा पक्ष बनलेल्या आरएसपीने यावेळी २७५ पैकी १८२ जागा जिंकल्या.

**रॅप बॅटल जिंकल्यानंतर बालेन प्रसिद्धीझोतात**

नेपाळचे नवे पंतप्रधान बालेन शाह यांची कहाणी पारंपरिक राजकारणापेक्षा वेगळी आहे. १९९० मध्ये काठमांडूच्या नारदेवी परिसरात जन्मलेले बालेन हे त्यांच्या आई-वडिलांचे सर्वात लहान पुत्र आहेत. त्यांचे वडील आयुर्वेदिक डॉक्टर आहेत, तर त्यांची आई कुटुंबाची जबाबदारी सांभाळत असे. बालेन विवाहित असून पत्नी आणि मुलीसोबत राहतात.

संपादकीय लेखणीतून...

## चाकणकरांचे राजीनामा सत्र

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाल्यानंतर संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली. या पार्श्वभूमीवर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचा खरातची पाद्यपूजा करतानाचा व्हीडीओ व्हायरल झाल्यानंतर चाकणकर यांच्यावर चोहोबाजूंनी टीकेची झोड उठली. विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली. अखेर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतल्यानंतर रात्री उशिरा चाकणकरांनी राजीनामा दिला. वैयक्तिक कारणाने आपण राजीनामा देत आहोत असे त्यांनी म्हटले आहे. रुपाली चाकणकर यांनी नुकतीच पुणे डीजींची भेट घेतली होती. तसेच सुनेत्रा पवार यांच्या भेटीसाठी जाण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांनी वर्षा बंगल्यावर भेट घेतली होती. त्यानंतर रात्री उशिरा चाकणकर यांनी सुनेत्रा पवारांची भेट घेतली व या भेटीत त्यांनी आपला राजीनामा त्यांच्याकडे सुपुर्द केला.

नाशिकमधील महिला अत्याचार प्रकरणातील आरोपी आणि तथाकथित भोंदू ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात याच्याशी संबंधित प्रकरणामुळे अडचणीत आलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना अखेर आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला.सुनेत्रा पवार यांनी हा राजीनामा स्वीकारला आहे. दरम्यान, आपण वैयक्तिक आणि स्वेच्छेने राजीनामा देत असल्याचे चाकणकर यांनी स्पष्ट केले आहे. रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरून पायउतार व्हावे लागले आहे. संवैधानिक पदावर असताना राजीनामा द्यावा लागलेल्या रुपाली चाकणकर या राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या तिसऱ्या नेत्या ठरल्या आहेत. या आधी धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे यांना त्यांच्यावर झालेल्या आरोपांमुळे मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. चाकणकर या नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथील श्री शिवनिका संस्थानच्या विश्वस्त सदस्य असून, त्या संस्थेचा कॅप्टन अशोक खरात हा अध्यक्ष आहे. महिलांचा लैंगिक छळ आणि बलात्काराच्या आरोपांवरून पोलिसांनी खरातला अटक केल्यानंतर मागील तीन दिवसांपासून चाकणकर चांगल्याच अडचणीत आल्या होत्या. एक वर्षापूर्वी भोंदूबाबा म्हणून खरात यांचा पदार्फाश करणाऱ्या स्थानिक पत्रकाराला धमकावून माफी मागायला लावल्याचा आरोपही त्यांच्यावर करण्यात आला आहे. याशिवाय चाकणकर यांचे भोंदू खरातसोबतचे विविध फोटो आणि व्हीडीओ समाज माध्यमावर व्हायरल झाले आहेत. त्यामुळे चाकणकरांच्या राजीनाम्यासाठी विरोधी पक्षांसह विविध स्तरांतून दबाव वाढत चालला होता.त्यातच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया तसेच शिवसेना (उबाठा)नेत्या सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषदा घेऊन चाकणकर यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी हे प्रकरण गांभीयार्ने घेऊन चाकणकर यांच्यावर कारवाई करण्याचे संकेत दिले होते. रुपाली चाकणकर यांनी भोंदू खरात प्रकरणात आपली बाजू मांडण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शुक्रवारी भेट घेतली होती. भेटीत फडणवीस यांनी चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार रात्री उशिरा चाकणकरांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची देवगिरी या शासकीय निवासस्थानी भेट घेऊन त्यांच्याशी अर्धा तास चर्चा केली. मुख्यमंत्र्यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षांना राजीनामा देण्याचे आदेश दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार, परंतु केवळ राजीनामा घेऊन चालणार नाही, तर या प्रकरणाच्या तळाशी जाऊन पारदर्शक चौकशी करावी आणि आमदार अमोल मिटकरी म्हणतात त्याप्रमाणे अजितदादांच्या अपघाताशी या भोंदूबाबाचे कनेक्शन आहे का? याचाही तपास व्हायला हवा, असे ट्विट रोहित पवार यांनी केले आहे. भोंदूबाबा अशोक खरात याच्यावर महिलांवरील अत्याचाराचे गंभीर आरोप होत आहेत. या प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी कारवाईचे आदेश दिल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ माजली. अनेक राजकीय व्यक्तींचा त्याच्याशी संपर्क असल्याचे पुरावे उघड झाल्याने सत्ताधाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. राज्यात अंधश्रद्धा निर्मूलन कायदा लागू करण्यात आला असूनही याला अनेकजण बळी पडत आहेत. आता तर याचा संबंध अजित पवारांच्या मृत्यूशी जोडला जात असल्याने यात मोठाच ट्विस्ट आला आहे. अलिकडेच अमेरिकन न्यायालयात एपस्टीन फाईलमधील संशयितांची नावे उजेडात आल्याने जगभरात खळबळ माजली. काहीसा असाच प्रकार खरात बाबाच्याही संदर्भात दिसून येतो. त्याच्या १०० क्लिप्स सापडल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे आता पीडित महिला पुढे आल्यास त्याच्याविरुद्ध भक्कम पुरावे मिळतील आणि त्यामुळे खरातभोवती घट्ट फास आवळला जाईल.

# भोंदूगिरी करणारा अशोक खरात कोट्याधीश कसा बनला?

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भोंदुगिरी करून महिलांसह राजकीय नेत्यांना आपल्या वर्चस्वाखाली ठेवणारा दहावी नापास अशोक खरात याचे कोट्यावधीचे साम्राज्य कसे वाढले? एक सर्वसाधारण व्यक्ती कोट्याधीश कसा बनतो, हा सर्वांना चकित करणारा प्रश्न आहे पण हे खरे आहे. मंत्र तंत्राचा वापर करून या भोंदू बाबा ने महिलांसह सरकारला गंडविले. अनेक राजकीय नेते या बाबांचे लोटांगण घालत होते.. दररोज कष्ट करणारे कधीच खोट्याधीश होत नसतात. मात्र मात्र अशोक खरात मी अल्पवधीतच कोट्यावादीची माया जमवली हे सर्व कशी शक्य झाले असेल? या प्रश्नाचे उत्तर सोपे आहे. अशोक खरात ला राजकीय वरदहस्त मिळाल्याने तो कोट्याधीश झाला आणि यातूनच त्याने आपले मोठे साम्राज्य उभारले.

भोंदूबाबा कोट्यवधी रुपयाची इस्टेट जमा करतात. राजकीय पाठबळ असल्याशिवाय हे कृत्य होऊ शकत नाही.अशोक खरात प्रकरणात राजकीय वरदहस्त आणि त्यातून जमवलेल्या संपत्तीबाबत सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

खरातने अंधश्रद्धेचा आधार घेऊन आणि महिलांचे शोषण करून कोट्यवधींची माया जमवल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्याच्या संपत्तीची व्याप्ती पाहता, त्याला प्रभावशाली लोकांचे पाठबळ असावे असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

### उच्चपदस्थांशी संपर्क

तपासादरम्यान अशी माहिती समोर येत आहे की, अनेक मोठे अधिकारी आणि राजकीय नेते हे खरातचे 'शिष्य' होते, ज्यामुळे त्याला कायदेशीर कारवाईतून संरक्षण मिळत गेले असावे.

### सरकारकडून कोट्यावधी रुपयांची मदत

नाशिकमधील भोंदूगिरीच्या आरोपाखाली अटकेत असलेला अशोक खरात याच्या ईशान्येश्वर मंदिरासाठी तत्कालीन महायुती सरकारने २०१८ मध्ये दीड कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याचे समोर आले आहे. हा निधी खरातच्या संस्थेला मिळाल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे. खरातकडे ६३ एकर जमीन व ४० कोटींपेक्षा जास्त संपत्ती असल्याची माहिती समोर येत आहे.

३१ मार्च २०१८ रोजीच्या शासन आदेशानुसार दीड कोटींचा निधी मंजूर झाला होता, जो तत्कालीन पर्यटन मंत्र्यांच्या आदेशाने दिल्याचे समजते. या प्रकरणावरून राजकीय वाद निर्माण झाला असून, सरकारवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

भोंडूगिरी करणाऱ्या भामट्याला सरकारकडून ईशान्येश्वर मंदिर विकासासाठी एक कोटी पाच लाख रुपयांचा निधी सरकारकडून मिळाला. तत्कालन पर्यटन मंत्री राजकुमार रावल यांच्या १ मध्यस्थीने हा निधी देण्यात आल्याचे सांगितले जात असून त्यामुळेच सत्ताधारी पक्षांच्या जवळीचा मुद्दाही चर्चेत आला आहे. योगेश नव्हे तर दुष्काळाच्या झळा सर्वसामान्य लोकांचं शेतकऱ्यांना होत असताना देखील महाविकास आघाडी सरकारच्या काळात दारणा धरणातून पाणी आरक्षणाचा निर्णय खरात यांच्या संस्थेसाठी देण्यात आल्याचे देखील समोर आले आहे.

### २०१८ मध्ये राज्यात भाजप सेना युतीचे सरकार

२०१८ साली भाजप-शिवसेनेच्या महायुती सरकारने अशोक खरातच्या ईशान्येश्वर मंदिरासाठी दीड कोटींचा निधी मंजूर केला होता. त्या निधी संदभार्तील २०१८ चा शासन आदेश असून, तत्कालीन पर्यटन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडून १०५ कोटींचा रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. ३१ मार्च २०१८ रोजी ईशान्येश्वर मंदिरासाठी हा जीआर काढण्यात आला होता.१०५ कोटींमधून २५ लाख रुपये तत्काळ मंजूर करण्यात आले होते. यामध्ये सभामंडप बांधकाम, पेव्हर ब्लॉक बसवणे, महिला व पुरुष प्रसाधनगृह, चेंजिंग रूम, भक्तनिवास बांधकाम, विद्युतीकरण व लैंडस्केपिंग यांचा समावेश होता. ही माहिती समोर आल्याने आता या विषयावरुन नवीन वादाला तोंड फुटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, खरातचे आर्थिक व्यवहार संभाळणारा सीए पुण्यातील असल्याची माहिती समोर आली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या निवेदनात त्याचा उल्लेख केला होता. ललित पोफळे असे अर्थिक व्यवहार बघणाऱ्या सीएचे नाव असून, तो खरातच्या ट्रस्टवर पाच वर्षे संचालक होता. या दोघांनी एकमेकांच्या खात्यावर पैशांची देवाणघेवाण केल्याचे बोलले जात आहे. त्याने खरातच्या पैशातून पुणे, नोयडा, दिल्ली आणि मुंबईमध्ये अनेक संपत्ती घेतल्याचे बोलले जाते. खरात हा पोफळेच्या माध्यमातून अधिकाऱ्यांच्या काळ्या पैशांची गुंतवणूक करत होता, असे समजते.

खरात प्रकरणाला आता राजकीय वळण मिळाल्याने हे प्रकरण दिवसेंदिवस गंभीर होत आहे अनेक नेते या प्रकरणात शी संबंधित असून अनेक नेते या प्रकरणात अडकण्याची शक्यता आहे. अशोक खरात याच्याकडे अनेक मंत्री आणि बड्या राजकारण्यांची महत्त्वाची माहिती असू शकते. हे सर्व संबंध उघड होऊ नयेत,

यासाठी प्रयत्न देखील होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

भोंदू बाबा खरात याच्याशी संबंध असल्याने अनेक राजकीय नेत्यांची कोंडी होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या नेत्या रूपाली चाकणकर यांना त्याचा फटका बसला. आता अन्य कोणते नेते यात अडकणार याकडे लक्ष लागलं आहे.

पोलिसांनी भोंदू बाबा कॅप्टन अशोक खरातचा मोबाईल ताब्यात घेतला आहे. त्याचा सीडीआर दोन दिवसांपूर्वीच मिळाला. यामध्ये महायुती सरकारमधील एका मंत्र्याचा कॅप्टन खरातशी नियमित संपर्क असल्याचे स्पष्ट झाले. महायुती सरकारमधील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा निकटवर्तीय असलेला हा मंत्री कोण? हे सर्वश्रुत आहे. या मंत्र्यांनी कॅप्टन खरात याच्या घराच्या रस्त्यासाठी तीन कोटी रुपये निधी मंजूर केला होता. मंदिरासाठी रस्ता असल्याचे दाखविण्यात आले आहे. कॅप्टन खरात याच्या मोबाईलमध्ये तीस ते चाळीस हाय प्रोफाईल नेत्यांचे नंबर आढळले. या नंबर बाबत पोलीस आपली माहिती गोपनीय ठेवत आहेत. मात्र या नेत्यांकडे चौकशी केली जाण्याची शक्यता आहे. भोंदू कॅप्टन खरात यांनी पोलिसांच्या तपासात फारशी माहिती दिलेली नाही.

यामध्ये सीडीआर व त्यातील राजकीय नेते यांना तपासासाठी पाचारण करण्याची पोलिसांची तयारी आहे. भोंदू कॅप्टन खरात याच्या तपासाचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी पोलिसांनी या राजकीय नेत्यांकडून माहितीची खातरजमा करण्याची तयारी केली आहे. त्यात महायुतीचा एक मंत्री नियमित संपर्कात असल्याचे आढळल्याने, अनेक राजकीय नेत्यांनी कॅप्टन खरात प्रकरणाचा धक्का घेतला आहे. खरातच्या कोट्याधीश होण्यामागे केवळ भोंदूगिरी नसून त्याला मिळालेला राजकीय आणि प्रशासकीय वरदहस्त हा कळीचा मुद्दा ठरत आहे.

- ९५६१५९४३०६

## मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांना पत्र

## महापालिका,नगरपालिका,जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्य पद पत्रकारांना सुध्दा मिळावे!

**प्रति, सन्माननीय देवेन्द्रजी फडणवीस,**
**मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य**

महोदय,

महापालिका,नगरपालिकेप्रमाणे राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्य नेमले जाणार आहेत.या संदभार्तील महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या ( दुसरी सुधारणा ) विधेयक मंगळवार दिनांक १७ मार्च २०२६ ला विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले याचे मनापासून स्वागत. कारण हे सामाजिक कार्याच्या दृष्टिकोनातून सरकारने उचलेले अत्यंत महत्वाचे आणि योग्य पाऊल आहे याची जितकी प्रशंसा केली जाईल तितकी कमी आहे.



सामाजिक कार्य करणारे अनेक क्षेत्रातील निष्ठावंत, विचारवंत, सामाजिक बांधिलकी व समाजासाठी झटणारे वेगवेगळ्या क्षेत्रातील समाजसेवक सुद्धा असतात आणि आहेत त्यांचे कार्य अफाट असते परंतु दिसत नाही,ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.यात प्रामुख्याने पत्रकार, लेखक, साहित्यिक, डॉक्टर, वकिल, कलाकार, स्वतंत्र पत्रकार, सीए, निवृत्त शिक्षक, विचारवंत, पर्यावरण प्रेमी, निवृत्त अग्निशमन अधिकारी, सैन्यदलातील निवृत्त अधिकारी, पर्यावरण प्रेमी इत्यादी अशा अनेक प्रकारच्या सतत सामाजिक कार्यासाठी झटणाऱ्यांचा स्वीकृत सदस्यांमध्ये समावेश होने अत्यंत गरजेचे आहे.

याच अनुषंगाने देशाचा "चौथास्तंभ"असलेला पत्रकार यांची सामाजिक कायार्ची जाणीव लक्षात घेऊन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पुढील दृष्टिकोनातून विकासाची वाटचाल प्रबळ व्हावी व समाजाला योग्य न्याय मिळावा या दृष्टिकोनातून प्रत्येक क्षेत्रात पत्रकारांना स्वीकृत सदस्य पदाचा मान मिळायलाच हवा.कारण पत्रकारांचे कार्य ग्रामीण, शहर, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत मोठ्या प्रमाणात असते याचा फायदा महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांना चांगल्या प्रकारे होऊ शकतो ही बाब नाकारता येत नाही.कारण याबाबतचा पत्रकारांना सखोल अभ्यास व दांडगा अनुभव असतो याचा फायदा राज्याच्या ग्रामीण आणि शहराच्या विकासामध्ये व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अवश्य होईल असा मला दृढ विश्वास आहे.

ज्याप्रमाणे सरकारने स्वीकृत सदस्य पदाचे विधेयक एकमताने मंजूर केले त्याचप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात पत्रकारांना स्वीकृत सदस्य पदाचा मान मिळावा या दृष्टिकोनातून मुख्यमंत्री महोदय आपण अवश्य पाऊल उचलावेत अशी या पत्राद्वारे विनंती करण्यात येत आहे.

असे जर झाले तर राज्याचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले जाईल व चौथ्यास्तंभाचा सन्मान उंचावेल. यावर सन्माननीय मुख्यमंत्री महोदय आपण अवश्य गांभीर्याने विचार कराल व पत्रकारांना राज्यात स्वीकृत सदस्य पदाचा बहुमान देऊन राज्याला गौरवान्वित कराल.आपण माज्या या विनंती पुर्वक पत्राचा अवश्य विचार कराल अशी मला खात्री आहे.

धन्यवाद.

जय हिंद! जय महाराष्ट्र.

**आपला शुभचिंतक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार / लेखक)**

# कामदा एकादशी जप :ॐ नमो भगवते वासुदेवाय नमः

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

कामदा एकादशी ही चैत्र शुक्ल पक्षातील एकादशी आहे. हिंदू नववर्षातील पहिली एकादशी म्हणजे कामदा एकादशी. या एकादशीचे व्रत केल्याने मनातील कामना पूर्ण होतात त्यामुळे मनःशांती लाभते. हिंदू धर्मामध्ये एकादशीला विशेष महत्त्व दिले जाते. एकादशीच्या दिवशी अनेक भक्त उपवास आणि पूजा करतात. कामदा एकादशी हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा उपवास मानला जातो. कामदा एकादशीचे व्रत चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशी तिथीला केले जाते आणि असे मानले जाते की हे व्रत पाळल्याने व्यक्तीचे सर्व पाप आणि दुःख दूर होतात. या व्रताचे काही महत्त्वाचे नियम आहेत, ज्यांचे पालन केल्याने शुभ फळे मिळतात. मान्यतेनुसार, कामदा एकादशीचे व्रत केल्याने सर्व इच्छा पूर्ण होतात आणि पापांपासून मुक्तता मिळते.

वारकरी संप्रदायामध्ये एकादशीचे व्रत अगदी भक्तीभावाने ठेवले जाते. या दिवशी भगवान विष्णुंची पूजा केली जाते. प्रत्येक चांद्रमासातील शुक्ल व कृष्ण पक्षातील ११व्या तिथीला एकादशी म्हटले जाते. या दिवशी विष्णुभक्त तसेच विठ्ठलभक्त उपवास करतात. एकादशीच्या दुसऱ्या दिवशी उपवास सोडला जातो. स्मार्त आणि भागवत एकादशी असे दोन भेद सांगितले आहे. ज्या पक्षात हे दोन भेद येतात. त्यावेळी पंचांगात पहिल्या दिवशी स्मार्त व दुसऱ्या दिवशी भागवत, असे लिहिलेले असते. अनेकदा एका पक्षात स्मार्त आणि भागवत, अशा एका पाठोपाठ दोन एकादशी असतात. यातील पहिल्या येणाऱ्या एकादशीला स्मार्त नाव असते. परंतु, भागवत एकादशीला नाव नसते. या दिवशी भगवान विष्णुंची पूजा कशा पद्धतीने करावी तसेच एकादशीचे नेमकं महत्त्व काय याविषयी जाणून घेऊयात.

**पूजाविधी** - वारकरी संप्रदायामध्ये परंपरेने भागवत एकादशी साजरी केली जाते. या एकादशीच्या दिवशी भगवान विष्णुंची पूजा करून विष्णू भक्त दिवसभर उपवास करतात. भागवत एकादशी व्रत हे पूर्ण नियम, श्रद्धा व विश्वासाने केले जाते. या व्रताच्या प्रभावामुळे मोक्ष प्राप्ती होते. या व्रतामुळे अश्वमेध यज्ञ, घोर तपस्या, तीर्थ स्नान व दान या सर्वांपासून मिळणाऱ्या पुण्यापेक्षाही जास्त पुण्य मिळते, असे पौराणिक कथेत म्हटले आहे.

**महत्त्व**- वारकरी संप्रदायामध्ये एकादशीच्या व्रताला विशेष महत्त्व आहे. प्रत्येक मासात २ याप्रमाणे वर्षामध्ये २४ एकादशी येतात. यातील चैत्रापासून फाल्गुन मासातील शुक्ल पक्षात कामदा, मोहिनी, निर्जला, शयनी, पुत्रदा, परिवर्तिनी, पाशांकुशा, प्रबोधिनी, मोक्षदा, प्रजावर्धिनी, जयदा आणि आमलकी यांचा समावेश होतो. याशिवाय कृष्ण पक्षात पापमोचनी, वरुधिनी, अपरा, योगिनी, कामिका, अजा, इंदिरा, रमा, फलदा, सफला, षट्तिला व विजया या एकादशींचा समावेश होतो. पौराणिक कथेनुसार एकादशीच्या दिवशी सर्व पापे अन्नाचा आश्रय करून राहतात. म्हणून जो मनुष्य एकादशीच्या दिवशी अन्न भक्षण करतो त्याला ती पापे लागतात. म्हणून एकादशीला उपवास केला जातो. या दिवशी दान केल्यास भगवान विष्णू प्रसन्न होतात, अशी धारणा आहे.

विष्णुभक्तांसाठी एकादशी हे व्रत म्हणजे एक पर्वणीच असते. त्यामुळे ते नेमाने सर्व एकादशी करतात. ज्यांना उपास करणे शक्य नसते, ते भगवान विष्णूची पूजा करतात. तसेच साधा सात्त्विक आहार घेतात. "ॐ नमो भगवते वासुदेवाय नमः" या मंत्राचा जप करतात. अथवा विष्णुसहस्त्रनामाचे श्रवण-पठण करतात. मात्र जेव्हा एखादी तिथी विभागून येते आणि दिनदर्शिकेत दोन दिवसांवर एकाच तिथीचा दोनदा उल्लेख येतो तेव्हा काही भाविकांचा गोंधळ होतो. जसे की स्मार्त आणि भागवत एकादशी! मागील ९ डिसेंबर रोजी आलेल्या उत्पत्ती एकादशीला ही आणखी दोन नावे का? हा प्रश्न तुम्हालाही पडला असेल तर ही माहिती तुमच्यासाठी!

**उत्पत्ती एकादशी**: सर्व व्रतांमध्ये एकादशीच्या व्रताचे विशेष महत्त्व आहे. असे मानले जाते की या व्रताच्या प्रभावाने वर्तमानासह मागील जन्माची पापे नष्ट होतात. यासोबतच अनेक पिढ्यांतील पितरांना मोक्ष प्राप्त होतो. ज्यांना एकादशीचा उपवास सुरू करायचा आहे ते उत्पत्ती एकादशीपासून हे व्रत सुरु करू शकतात. या एकादशीच्या तिथीला देवीचा जन्म झाला म्हणून तिला उत्पन्ना तसेच उत्पत्ती एकादशी असेही म्हणतात. जाणून घेऊ एकादशीचे महत्त्व आणि कथा.

मग स्मार्त एकादशी म्हणजे काय? तर दशमी संपून एकादशी सुरू होताना त्या तिथीने सूर्योदय पाहिला नाही पण तो दिवस नव्या तिथीच्या नावे सुरू झाला असेल तर त्याला स्मार्त तसेच दर्श असा उल्लेख केला जातो. म्हणजे तिथी सुरू झाली पण तिथीशी संबंधित व्रत सूर्योदय पाहिलेल्या दिवशीच करायचे यासंबंधी ती सूचना असते. म्हणून ती स्मार्त एकादशी!

**भागवत एकादशी**: जी तिथी सूर्योदय पाहते ती तिथी आपल्याकडे ग्राह्य धरली जाते. म्हणजेच एकादशी तिथी आदल्या दिवशी सुरू झालेली असली तरी तिने जर दुसऱ्या दिवशीचा सूर्योदय पाहिला असेल तर ती तिथी पाळली जाते आणि दिनदर्शिकेवर देखील सूर्योदय पाहिलेल्या तिथीवर भागवत धर्माचे ध्वजचिन्ह दिसून येते. भागवत धर्म पाळणारे वारकरी बांधव त्यालाच भागवत एकादशी म्हणतात. वैष्णव उदय तिथी मानतात. स्मार्त वाले जिथून तिथी सुरू झाली ती तिथी मानतात आणि व्रत सुरु करतात. हा तो फरक. स्मार्त म्हणजे जे लोक वेंदांवर, श्रुती स्मृती, पुराण यांना प्रमाण मानतात, ज्यांना वैदिक धमार्चं ज्ञान आहे, ते स्मार्त एकादशी पाळतात. थोडक्यात ऋषी, मुनी तसेच कर्मकांड करणारे योगी स्मार्त एकादशी करतात. तर वैष्णव म्हणजे जे विष्णू भक्त आहेत, संसारी आहेत, जे सूर्योदय पाहणारी तिथी ग्राह्य धरतात ते भागवत एकादशीचे व्रत करतात. म्हणून विष्णू भक्तांनी स्मार्त एकादशीला विष्णू पूजा करावी मात्र एकादशी व्रताचे पालन भागवत एकादशीला करावे, असे शास्त्र सांगते.

- ९४२३७१४८८३

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मिलींद विश्राम पवनीपगार, सुमित प्रिंटर्स, बी-१५, एनआयटी कॉम्प्लेक्स, मेडिकल रोड, उंटखाना, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२४ येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# जगण्याची उमेद घेऊन इतरांना प्रेरणा देणारे : सेवानिवृत्त शिक्षक नंदकिशोर गमे

## वेदना व एकाकीपणाचे रूपांतरण संवेदनशीलतेत

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
आयुष्याने ज्याला एकट्याने झुंजायला लावलं, त्याने आपल्या वेदनेचं रूपांतर इतरांच्या सन्मानात केलं. हीच कहाणी सेवानिवृत्त शिक्षक नंदकिशोर गमे यांची आहे

पंचायत समिती नरखेड अंतर्गत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, खराळा येथून दिनांक ३० जून २०२३ रोजी सेवानिवृत्त झालेले नंदकिशोर गमे यांचे जीवन म्हणजे संघर्ष आणि संवेदनशीलतेचा एक अनोखा संगम आहे. कोरोना महामारीच्या त्या काळरात्री त्यांनी स्वतः दोनदा मृत्यूशी सामना केला. पॉझिटिव्ह होऊन, प्रकृती खालावून, तरीही ते परतले. पण या लढाईत त्यांनी सर्वात मोठं गमावलं त्यांच्या जीवनाचा आधारस्तंभ असलेल्या सौभाग्यवती स्व. अलकाताई यांना त्याच महामारीने त्यांच्यापासून कायमचं दूर नेलं. पत्नीच्या जाण्यानंतर घर ओकंबोकं झालं. उच्च मधुमेहामुळे सतत इन्सुलिन सलाईन मशीनचा सोबती घेऊन जगणं, एकट्याने दिवस काढणं हे सारं सोसताना कोणीही खचून गेलं असतं. पण नंदकिशोर गमे खचले नाहीत. त्यांनी आपल्या एकाकीपणावर शोक करण्यापेक्षा त्या एकांताला एका उदात्त उद्देशाने भरून टाकलं.

सेवानिवृत्तीनंतर त्यांनी एक हृदयस्पर्शी संकल्प केला की, काटोल आणि नरखेड तालुक्यातील जिल्हा परिषद शिक्षकांपैकी जे शिक्षक असामान्य व वैशिष्ट्यपूर्ण कार्य करतील, त्यांना मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्याचा. विशेष म्हणजे, हा उपक्रम ते स्वतःच्या निवृत्तीवेतनातून, स्वखर्चाने राबवत आहेत. त्यामागे कोणती संस्था नाही, कोणता पुरस्कर्ता नाही , केवळ एका संवेदनशील मनाची तळमळ आहे.

या उपक्रमांतर्गत त्यांनी नुकताच काटोल तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये कार्यरत असलेल्या तीन प्राथमिक शिक्षकांचा सत्कार केला.जे तालुक्यातून प्रथमच पीएचडी प्राप्त करणारे शिक्षक डॉ.महेंद्र साव, डॉ.राजेंद्र टेकाडे आणि डॉ. योगेश चरडे ठरलेले आहे. हा सत्कार केवळ एक औपचारिकता नव्हती. तो एका दुखद मनाने इतरांच्या यशाला दिलेली भावपूर्ण दादही होती.

केवळ शिक्षकांचा गौरवच नव्हे, तर जिल्हा परिषद शाळांमधील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठीही नंदकिशोर गमे सर नेहमी पुढाकार घेत असतात. शालेय शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून त्यांना शालेय साहित्य व आर्थिक मदत पुरवण्याचे कार्य ते स्वयंस्फूर्तीने करत असतात. गरजू मुलांच्या शिक्षणाची काळजी करणे हे त्यांच्या सेवाभावी जीवनाचे एक अविभाज्य अंग बनले आहे.

नंदकिशोर गमे हे आज केवळ एक सेवानिवृत्त शिक्षक नाहीत. ते एक जिवंत प्रेरणा आहेत. शरीरावर व्याधींचं ओझं, मनावर विरहाची जखम, तरीही हातात सन्मानपत्र घेऊन दुसऱ्याच्या डोळ्यांत आनंदाश्रू आणण्याचं सामर्थ्य हेच त्यांचं खरं मोठेपण आहे.



# जयघोषात संपन्न रामनवमी सप्ताह, मोवाड नगरी झाली अयोध्यामय

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
नरखेड तालुक्यातील मोवाड शहरातील आठवडी बाजार परिसरातील श्री राम मंदिरात गुढीपाडव्यापासून सुरू झालेल्या रामनवमी सप्ताहाचा धार्मिक उत्साहात समारोप करण्यात आला. आठ दिवस चाललेल्या या आध्यात्मिक सोहळ्याची सांगता रामनवमीच्या दिवशी काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसाद वितरणाने झाली.

या सप्ताहात दररोज पहाटे काकड आरती, त्यानंतर रामायण वाचन, दुपारी धार्मिक प्रवचन, सायंकाळी हरिपाठ आणि रात्री शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले होते. ही कथा ह.भ.प. प्रमोद महाराज कटारे यांच्या प्रभावी वाणीतून रंगली. त्यांच्या रसाळ कथनशैलीमुळे भाविक मंत्रमुग्ध झाले होते. समारोपाच्या दिवशी कटारे महाराजांनी काल्याचे कीर्तन सादर करून उपस्थितांना अध्यात्मिक मार्गदर्शन केले.



रामनवमीच्या निमित्ताने सायंकाळी श्री राम सेवक व सकल हिंदू समाज, मोवाड यांच्या वतीने शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत प्रभू श्रीरामांची आकर्षक मूर्ती, राम दरबाराची देखणी सजावट, विविध भजन मंडळ्यांचे सुमधुर सादरीकरण, तसेच पारंपरिक वेशभूषेतील बालकांचा सहभाग हे विशेष आकर्षण ठरले. ढोल-ताशांच्या गजरात व जय श्रीरामच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला.

शोभायात्रा मार्गावर नागरिकांच्या वतीने ठिकठिकाणी पिण्याचे पाणी, शरबत, चहा व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. युवकांनी शिस्तबद्ध नियोजन करत वाहतूक व गर्दी नियंत्रणात महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच महिला मंडळांनीही विविध सेवा उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाचे आयोजन श्री राम मंदिर पंचकमेटी यांच्या वतीने करण्यात आले होते. सप्ताहभर मंदिर परिसरात आकर्षक रोषणाई व सजावट करण्यात आली होती. भाविकांसाठी बसण्याची व निवासाची सोय, तसेच स्वच्छतेची विशेष काळजी घेण्यात आली होती.

मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून या धार्मिक सोहळ्याचा लाभ घेतला. गेल्या आठ दिवसांपासून जय श्रीरामच्या घोषणांनी दुमदुमलेले मोवाड शहर जणू अयोध्येची अनुभूती देत होते.

# बुटीबोरीच्या वृद्धाश्रमाला खाद्य सामग्री वितरित

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
अमर नगर ज्येष्ठ नागरिक मंडळ नागपूर च्यावतीने मंडळाचे अध्यक्ष देवीदास आगरकर व सचिव, वसंतराव इझनकर यांचे तर्फे ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे सचिव राजू मिश्रा यांच्या मार्गदर्शनात व उपस्थितीत पूर्णब्रह्म अभियाना अंतर्गत प्राप्त अंदाजे सात क्विंटल अन्नधान्य आणि इतर खाद्य सामग्री तथा साडेचार हजार रुपये नगदी बुटीबोरी येथील वृद्धाश्रमाला प्रदान करण्यात आले. अन्न धान्य वितरण कार्यक्रमाला अशोक सांभारे, डॉ.राजेश कुऱ्हाडे, विलास वाकडे, गणपतराव निंबाळकर, राजेश्वर डगरवार इत्यादी हजर होते.



# रविवारी निघणार भानेगावातून श्री साईची भव्य शोभायात्रा

## ठिकठिकाणी होणार जोरदार स्वागत

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**
परिसरातील भानेगाव येथील श्री साई मंदीर वर्धापन दिनानिमित्त पालखी सोहळा व भव्य शोभयात्रेचे आयोजन दिनांक २९ मार्च २०२६ रोजी मंगळवारला सायंकाळी ६.०० ते रात्री १०.०० वाजे पर्यंत करण्यात आले आहे यासंदर्भात मंदिर व्यवस्थापन कमिटीने नुकताच जय्यत तयारीचा आढावा घेतला असून शोभायात्रा मार्गावर ठिकठिकाणी जोरदार स्वागत करण्यात येणार आहे.

श्री साईबाबा मूर्तीची प्राणप्रतिष्ठा रामनवमीच्या तिसऱ्या दिवशी १७ एप्रिल २००७ साली भानेगाव येथील श्री साई मंदिरात करण्यात आली होती. हा दिवस वर्धापन दिन म्हणून साजरा केल्या जातो मागील अनेक वर्षांपासून श्री साई मंदिरात अविरत शोभायात्रा आयोजित करण्यात येते.

श्री साई मंदिर वर्धापन दिनानिमित्त रविवरला पहाटे ४.३० वाजता श्री साईचे मंगल स्नान, ५.०० वाजता श्री साईचा अभिषेक, ६.०० वाजता श्री साईची आरती, १०.०० वाजता भजन, दुपारी १२.०० वाजता मध्यान्ह आरती, २.०० वाजता कीर्तन,



सायंकाळी ६.०० वाजता श्री साईची आरती व त्यानंतर ६.३० ते रात्री १०.०० शोभायात्रा आयोजित करण्यात आली आहे.

शोभायात्रेत भजन मंडळ, ११ घोडे, २ उंट, १० डिस्को लाईट बग्गी, बाबूळगाव बँड, आकर्षक रोषणाई, राम लक्ष्मण सीता, छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, महाराणा प्रताप, बाजीराव पेशवे, झाशीची राणी, जिजा माता, मावळे व श्री साईबाबा वेशभूषेत सजीव पात्र सामील करण्यात आले आहेत. शोभायात्रा श्री साई मंदिर भानेगाव, शिक्षक कॉलनी, उपासे ले आऊट, नविन बिना, आझाद चौक प्रकाश नगर, राम मंदिर, पोलीस स्टेशन, रेल्वे चौकी मुख्य बाजारपेठ, अन्नामोड आदि परिसरातून भ्रमण करून श्री साई मंदिर भानेगाव येथे समापन करण्यात येणार आहे यावेळी महाप्रसाद वितरित करण्यात येणार आहे शोभयात्रेत मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री साई मंदिर व हनुमान मंदिर पंच कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# माजी सभापतीने मागितली इंधनासाठी जंगलातून लाकडं आणण्याची परवानगी

## बुकिंग करूनही गॅस एजन्सी सिलेंडर मिळेना

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
गॅस सिलेंडरची मुबलक उपलब्धता असल्याची सरकारी गोष्ट कागदावरच राहिली आहे. प्रत्यक्षात मात्र सामान्य ग्राहकांना गॅससाठी भटकंती करावी लागत असून, शासनाच्या नाकर्तेपणामुळे नागरिकांना स्वयंपाकासाठी जंगलातील लाकडावर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. माजी पंचायत समिती सभापती कृष्णा गुलाबराव घोडेस्वार यांनी या प्रकरणी तहसील कार्यालयात धडकी भरवणारी विनंती दाखल केली आहे.

ऑनलाईन बुकिंग केल्याला पंधरा दिवस उलटूनही ग्राहकाला गॅस सिलेंडर न मिळाल्याने तहसीलदारांकडे लाकडे आणण्याची परवानगी मागणारा हा अर्ज म्हणजे प्रशासनाच्या कारभाराचे वाभाडे काढणारा ठरला आहे.



मन्साराम श्रावण सोनावणे रा. सालेभट्टी पुनर्वसन, यांनी पंधरा दिवसांपूर्वी सिलेंडरची बुकिंग केली होती. आज ते सिलेंडर घेण्यासाठी गॅस एजन्सी कार्यालयात गेले असता त्यांना रिकाम्या हाती परत पाठविण्यात आले. एजन्सीच्या कर्मचाऱ्याने तर पुढील ४५ दिवस सिलेंडर मिळणार नसल्याचे सांगून ग्राहकाला अक्षरशः हुसकावून लावले.

या घटनेचा तीव्र निषेध करताना माजी सभापती घोडेस्वार यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, एकीकडे शासन सिलेंडरचा मोठा साठा उपलब्ध असल्याची आश्वासने देत आहे, तर दुसरीकडे सामान्य नागरिकांना उपाशी राहण्याची वेळ आली आहे. त्यांनी प्रशासनाचे दावे उघडे पाडतांना सामान्य जनतेला स्वयंपाकासाठी जंगलातून लाकडे आणण्याची तातडीने परवानगी देण्याची मागणी केली आहे.

शासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी ही बाब उघडकीस आली असून, आजवर शासनाने केलेली पुरेसा गॅस साठा असल्याची विधाने फोल ठरत आहेत. गॅसच्या टंचाईमुळे शहरातील नागरिक अक्षरशः हैराण झाले असून, पर्याय म्हणून त्यांना जंगलाकडे वळावे लागणार की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

तहसील कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या या निवेदनावर प्रशासनाकडून अद्याप कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. सामान्य माणसाच्या स्वयंपाकघरातील आग पेटविण्यासाठी प्रशासन आता काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात

### गहू हिवरा येथे रामनवमी उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजनाने उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
मौदा तालुक्याच्या सीमेवर स्थित पारशिवनी तालुक्यातील गट ग्रामपंचायत खंडाळा ( बटाटे )अंतर्गत येणाऱ्या गहू हिवरा येथे मागील ५१ व्या वर्षी प्रमाणे यंदाही गहू हिवरा येथे राम नवमी उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी माजी जि प सदस्य व्यंकटेश कारेमोरे सह गाव परिसरातील मान्यवर, युवक, युतीक, महिला, पुरुष बाल गोपाल मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हनुमान मंदिर पंचकमेटी अध्यक्ष दुर्योधन ठाकरे, सेवकराम लुहूरे, शेषराव ठाकरे, विठ्ठल नवघरे, जगदीश लुहूरे, सरपंच स्वप्निल बोरकुटे, गिरीधर लुहूरे,वसंतराव मसार, अखाडू मेश्राम, दिनकर महाले, अरुण मौतकार, सुनील लुहूरे, महेंद्र दोडके, सुधाकर साबरे, अर्जुन ठाकरे, युवराज लुहूरे, बाबाराव साबरे, खुशाल आपुरकर, शालिक शेंडे सह समस्त गावकरी मंडळींनी उपस्थित राहून सहकार्य केले.

### आस्था : विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांची रेलचेल



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
नरखेड तालुक्यातील मौजा मन्नाथ (खेडी) येथे श्रीराम जन्मोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य श्रीराम कथा प्रवचन सप्ताहाला गुरुवार, २६ मार्चपासून उत्साहात प्रारंभ झाला आहे. २ एप्रिलपर्यंत चालणाऱ्या या सप्ताहात विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांची मेजवानी भाविकांना अनुभवायला मिळणार आहे. रामनवमी व हनुमान जयंती निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीराम कथा सप्ताह समिती,मन्नाथ यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कथा प्रवचनासाठी वर्धा येथील प्रसिद्ध कथावाचिका ह.भ.प. भाग्यश्री ताई देवडे यांचे मार्गदर्शन लाभत आहे. या सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी हनुमान मंदिर देवस्थान, श्री गुरुदेव सेवा मंडळ, सत्संग मंडळ, महिला-पुरुष भजन मंडळ, महिला बचत गट तसेच ग्रामस्थ सक्रिय सहकार्य करत आहेत. सप्ताहभर चालणारा हा उपक्रम भक्ती, संस्कार आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारा ठरत आहे.

दरम्यान, दररोज विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सकाळी ५ वाजता प्रभात फेरी व स्वच्छता अभियान, सकाळी ६ वाजता ध्वजारोहण, सकाळी ७ वाजता गोमाता पूजन, सायंकाळी ५:३० वाजता सामुदायिक प्रार्थना, सायंकाळी ६ वाजता हरिपाठ, सायंकाळी ६:३० वाजता भजन आणि त्यानंतर श्रीराम कथा प्रवचन असे नियोजन करण्यात आले आहे. सप्ताहाचा समारोप गुरुवार, २ एप्रिल रोजी होणार असून दुपारी १ ते ३ वाजता कल्याचे कीर्तन आणि सायंकाळी ६ वाजल्यापासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या धार्मिक सोहळ्याचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा कमिटी पुनर्गठन सभेचे आयोजन शनिवारी व रविवारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
भारतीय बौध्द महासभा वरिष्ठ राष्ट्रीय कार्याध्यक्ष यांचे आदेशान्वये, केंद्रीय कार्यालय प्रमुख व समता सैनिक दल स्टाफ आफीसर अँड. एस.के. भंडारे यांचे दिनांक २८ मार्च रोजी मुंबई वरुन नागपुरात आगमन होणार आहेत तर भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दल यांची विदर्भात बांधणी करणे व नागपूर पूर्व जिल्हा शाखा तसेच नागपूर महानगर जिल्हा शाखा पुनर्गठन बैठकीला भंडारे यांच्या सोबत केंद्रीय संघटक इंजि. पद्माकर गणवीर, ट्रस्टी अमरदीपंकर शहारे, महाराष्ट्र अध्यक्ष यू. जी. बोराडे, भीमराव फुसे महाराष्ट्र संघटक हे खालील जिल्हा पुनर्गठन कार्यक्रमात उपस्थित राहणार आहेत. शनिवार २८ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता. क्रांतिवीर संत कबीर वाचनालय जयस्तंभ चौक कामठी आणि लगेच दुसऱ्या दिवशी रविवारी २९ मार्च रोजी सुगत बुध्द विहार, बाभुळबन, गरोबा मैदान पुर्व नागपूर येथे बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या धार्मिक मातृसंस्थेत सहभागी होऊन धार्मिक संस्कार विधीत सुसूत्रता आणणे यासाठी धार्मिक क्षेत्रात कार्यरत विविध संस्थांना एकत्र आणून येणाऱ्या काळात सशक्त धार्मिक एकसंघ समाज हेच ध्येय नजरेसमोर ठेवून बौद्धांनो एकजूट व्हावे, असे आवाहन डॉ.भीमराव आंबेडकर यांनी केले आहे.

त्या अनुषंगाने समस्त नागपुरकर बौद्ध व आंबेडकरी समुदाय व भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा व विभागीय पदाधिकारी, श्रामणेर, बौध्दाचार्य, केंद्रीय शिक्षक, समता सैनिक दल, समाजातील सक्रिय, शील संपन्न उपासक व भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून धम्मकार्य करण्यास ईच्छुक असणाऱ्या समाज, धम्मानुयायांनीं जास्तीत जास्त मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन इंजि.पद्माकर गणवीर, विदर्भ प्रभारी भारतीय बौद्ध महासभा यांनी केले.

### चंद्रभान श्यामरावजी उमाठे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
उप्पलवाडी कामठी रोड नागपूर येथील चंद्रभान श्यामरावजी उमाठे यांचे गुरुवार दिनांक २६ मार्च रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी मुलगा, मुलगी, आई दोन भाऊ व चार बहिनी असा मोठा आप्त परिवार आहे. वैशाली घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



थोडक्यात

## कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित वेतन व मृत कामगारांच्या लाभांबाबत सकारात्मक बैठक

### तांत्रिक अप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशनचा पाठपुरावा यशस्वी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

तांत्रिक अप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशनची कामगार आयुक्त, मुंबई तसेच महावितरण प्रशासन यांच्यासोबत महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला असोसिएशनचे राज्याध्यक्ष प्रभाकर लहाने व कार्याध्यक्ष विक्की कावळे उपस्थित होते. बैठकी दरम्यान स्मार्ट सर्व्हिसेस व क्रिस्टल या कंत्राटी कंपन्यांच्या कामगारांच्या प्रलंबित वेतनाचा मुद्दा ठळकपणे मांडण्यात आला. त्यावर स्मार्ट सर्व्हिसेस कंपनीने जानेवारी २०२६ पर्यंतचे वेतन लवकरच अदा करण्यात येईल असे आश्वासन दिले, तर क्रिस्टल कंपनीने फेब्रुवारी २०२६ पर्यंतचे वेतन अदा केल्याची माहिती दिली. तसेच कंत्राटी कामगारांना नियमित व वेळेवर वेतन मिळावे यासाठी कामगार आयुक्तांनी संबंधितांना आवश्यक सूचना देण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतली. इतर कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली. याशिवाय मयत कंत्राटी कामगार केशव वाकुडकर व स्व. रामभाऊ बोरकर यांच्या कुटुंबीयांना मृत्यूनंतर मिळणारे आर्थिक लाभ तातडीने देण्यात यावे, अशी मागणी असोसिएशन तर्फे करण्यात आली. यावर संबंधित लाभ लवकरच देण्यात येतील. असे प्रशासनाकडून आश्वासन देण्यात आले. असोसिएशनतर्फे सांगण्यात आले की, कंत्राटी कामगारांच्या हक्कांसाठी व न्यायासाठी संघटना भविष्यातही ठामपणे लढा देत राहील.

## नबीरा महाविद्यालय काटोल येथे गृह अर्थशास्त्र विभागात बोर्ड ऑफ स्टडीज कार्यक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नुकताच नबीरा महाविद्यालय काटोल येथे गृह अर्थशास्त्र विभागात बोर्ड ऑफ स्टडीज गृह अर्थशास्त्र नागपूर विद्यापीठ नागपूर आणि गृह अर्थशास्त्र विभाग नबीरा महाविद्यालय काटोल यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ स्तरीय एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचा विषय होता NEP- 2020- Implementation Reforms या कार्यक्रमाकरिता बोर्ड ऑफ स्टडीच्या चेअरपर्सन प्रोफेसर डॉ. संपदा नासेरी महिला महाविद्यालय नंदनवन यांचे मार्गदर्शन लाभले बोर्ड ऑफ स्टडीच्या मेंबर प्रोफेसर डॉ. भारती काटेखाये, एस एन मोर कॉलेज तुमसर आणि प्रोफेसर डॉ. सुजाता साखरे दयानंद आर्य कन्या महाविद्यालय नागपूर यांचेही मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष नबीरा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील कुमार नवीन होते.

या कार्यशाळेत NEP- २०२० अंतर्गत पाचवा सेम आणि सहावा सेम च्या अभ्यासक्रमाविषयी चर्चा करण्यात आली. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. विकास बारसागडे हे होते. या कार्यक्रमाचे आयोजन गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दमयंती घागरगुंडे यांनी केले होते या कार्यक्रमाचे संचालन डॉ. मीनाक्षी राऊत इंग्रजी विभाग, यांनी केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन डॉ.दमयंती घागरगुंडे यांनी केले या कार्यशाळेकरिता डॉ. सलामे आणि मानववंश विभागातील सर्व प्राध्यापक तसेच गृह अर्थशास्त्र विभागाच्या प्राध्यापक कल्याणी दंडारे यांनी सहकार्य केले या कार्यक्रमाकरिता नागपूर विद्यापीठाच्या विविध महाविद्यालयातून गृह अर्थशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका बहुसंख्येने उपस्थित होत्या.

## भंते आर्य नागार्जुन सुराई ससाई यांनी पंचशील ध्वज दाखवून धम्मा ध्वज यात्रेचे शुभारंभ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर दीक्षाभूमी दक्षता समिती व इतर सामाजिक संघटनेच्यावतीने प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या



२३३० व्या जयंती निमित्ताने रहाटे कॉलनी मेट्रो रेल्वे स्टेशन चौकातून " पंचशील धम्म ध्वज यात्रे"चे आयोजन करण्यात आले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष भंते आर्य नागार्जुन सुराई ससाई यांनी पंचशील ध्वज दाखवून धम्मा ध्वज यात्रेचे शुभारंभ केले. याप्रसंगी दीक्षाभूमी दक्षता समितीचे सल्लागार व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ता किशोर गेडाम उर्फ भाऊसाहेब, दीक्षाभूमी दक्षता समितीचे अध्यक्ष माया उके, सम्राट अशोक सेनेचे आशिष बनसोड, सामाजिक कार्यकर्ता अभिषेक थुलकर प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी दीक्षाभूमी येथील प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या पूर्ण आकृती पुतळ्याला दीक्षाभूमी दक्षता समितीचे सलाकार किशोर गेडाम यांच्या शुभहस्ते माल्यार्पण करण्यात आले. यावेळी चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या जन्मदिनानिमित्त केक सुद्धा कापण्यात आला. रॅलीमध्ये मोठ्या उत्साहाने बौद्ध उपासक उपासिकांनी भाग घेतला. पंचशील धम्म ध्वज यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे १२५ फूट लांबीचा पंचशील ध्वज ठरले. कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी राजेंद्र बोबडे, माला अंबुलकर, केथरिन बोदिले, वर्षा वालदे, कल्पना मेश्राम, वैशाली डबरासे, सुनंदा गायकवाड, किरण गौरखेडे, कविता लांडगे, रूकमाताई नानवटकर, सुधा पाटील, ताराचंद पखिडे, शिल्पा धमगाये, गंगा टेंभुर्णे अथक परिश्रम केले.

# गरिबांच्या हक्काच्या घराचे स्वप्न होणार साकार !

### २०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे झाली नियमानुकूल, ५०० चौ. फुटापर्यंतचे अतिक्रमण पूर्णपणे विनामूल्य, सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणे काढली जाणार, देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा अभूतपूर्व निर्णय

"राज्यातील एकही गरजू कुटुंब निवाऱ्याविना राहू नये, ही सरकारची भूमिका असल्याने, एक जानेवारी २०११ पर्यंतची अतिक्रमणे नियमानुकूल करून आम्ही गरीब व गरजू कुटुंबांना दिलासा दिला आहे. यामुळे लाखो कुटुंबांच्या आयुष्यात स्थिरता येईल. दर तीन महिन्याने या संदर्भातील आढावा घेतला जाईल.

**- चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री, महाराष्ट्र राज्य.**

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

राज्यातील लाखो गरीब आणि गरजू कुटुंबांचा निवासस्थानाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने महत्वाकांक्षी पाऊल उचलले. सन २०११ पर्यंत झालेली व सध्या केवळ निवासासाठी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला.

या निर्णयानुसार, कोणत्याही परिस्थितीत भारताचा नागरिक नसलेल्या व्यक्तीचे अतिक्रमण नियमित होणार नाही. याची दक्षता अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याने घ्यायची आहे. असे अतिक्रमण आढळल्यास पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तथापि, हा निर्णय मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून संपूर्ण राज्यासाठी लागू आहे. या आदेशानुसार, ५०० चौरस फुटांपर्यंतचे निवासी अतिक्रमण पूर्णपणे विनामूल्य नियमानुकूल करण्यात येणार आहे. तर उर्वरित क्षेत्रासाठी प्रचलित बाजारमूल्याच्या केवळ दहा टक्के रक्कम कब्जेहक्काची रक्कम म्हणून आकारली जाईल.

नदीपात्र, नाले, गायरान, सार्वजनिक रस्ते, वने, स्मशानभूमी, खेळण्याचे मैदान किंवा शाळा/रुग्णालयासाठी आरक्षित असलेल्या जमिनींवरील अतिक्रमणे कोणत्याही परिस्थितीत नियमित केली जाणार नाहीत. अशा बाधित कुटुंबांना 'प्रधानमंत्री आवास योजने'तून पर्यायी घरे उपलब्ध करून देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.





**विकसित महाराष्ट्राच्या दिशेने पाऊल**

'सर्वांसाठी घरे' हे धोरण आणि 'विकसित महाराष्ट्र २०४७' चे उद्दिष्ट गाठण्यासाठी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवणे हा या निर्णयाचा मुख्य उद्देश आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. यामुळे वेगवेगळ्या शासन मान्यतेची गरज पडणार नाही. या समित्याच निर्णय घेतील. जिल्हास्तरावर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली १७ सदस्यांची समिती असून, विधानसभा क्षेत्रनिहाय आमदारांच्या अध्यक्षतेखाली समित्या स्थापण्यात येणार आहेत. अतिक्रमण नियमित करण्यासाठीची पात्रता, अटी व शर्ती, जागेची मर्यादा व शुल्क आकारणी, अंमलबजावणीची कार्यपद्धती, अर्जासाठीची मुदत, पडताळणी, अंमलबजावणी यंत्रणा अशी सर्व यंत्रणा सज्ज करण्यात येणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्तिगत लक्ष घालून गरीब व गरजूंना घरे मिळावीत यासाठी बैठकी घेतल्या.

**प्रमुख वैशिष्ट्ये व अटी**

जमीन पती -पत्नी यांच्या संयुक्त नावाने 'भोगवटादार वर्ग-२' म्हणून दिली जाईल. ग्रामीण तसेच शहरी भागात जास्तीत जास्त १५०० चौ. फुटापर्यंतचे क्षेत्र नियमित, जास्त असलेले अतिक्रमण पाडण्यात येईल. ५०० चौ. फुटापर्यंतची सर्व निवासी अतिक्रमणे पूर्णपणे विनामूल्य नियमित. घराचा काही भाग व्यवसायासाठी वापरत असल्यास, बाजारमूल्याच्या २५% रक्कम. जमिनीच्या नोंदणीसाठी १००० चौ. फुटापर्यंत १००० रुपये शुल्क. १ जानेवारी २०११ पूर्वीच्या वास्तव्यासाठी मतदार यादी, वीज बिल, मालमत्ता पावती ग्राह्य. गेल्या १ वर्षातील रहिवासाचा पुरावा बंधनकारक.

# प्रभू श्रीरामाच्या जयघोषाने दुमदुमली जलालखेडा नगरी

### सामूहिक हनुमान चालीसा पठण, भव्य शोभायात्रा व महाप्रसाद वितरणाने रामनवमी उत्सव उत्साहात संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

प्रभू श्री राम यांच्या जन्मोत्सवानिमित्त जलालखेडा नगरीत भक्ती, उत्साह आणि जल्लोषाचे अनोखे चित्र पाहायला मिळाले. श्रीराम नवमी शोभा समितीच्या वतीने आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण गाव राममय झाले होते.

सकाळी ८ वाजता सामूहिक हनुमान चालीसा पठणाचे आयोजन करण्यात आले. या वेळी शेकडो रामभक्तांनी एकत्र येत भक्तीभावाने पठण करून वातावरण भक्तिमय केले. मंदिर परिसरात जय श्रीरामच्या घोषणांनी दुमदुमून गेले.

सायंकाळी ५ वाजता श्रीराम मंदिर पूर्वसन येथून भव्य शोभायात्रेला सुरुवात झाली. ढोल-ताशांच्या गजरात आणि डीजेच्या तालावर निघालेली ही शोभायात्रा जवळपास १ किलोमीटरपर्यंत पसरली होती. शोभायात्रेत दिंडी पथक, ढोलताशा पथक, महिलांचे लेझीम पथक, पारंपरिक गोंडी नृत्य तसेच आकर्षक झांकींचा समावेश होता. यामध्ये प्रभू श्रीराम, लक्ष्मण, सीता माता, छत्रपती शिवाजी महाराज, भारत माता, हनुमान, भगवान शंकर व भगवान कृष्ण यांच्या सजीव देखाव्यांनी भाविकांचे लक्ष वेधले.

गावातील विविध चौकांमध्ये शोभायात्रेचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. अनेक ठिकाणी



भाविकांनी पिण्याच्या पाण्याची, शरबताची तसेच प्रसादाची व्यवस्था करून सामाजिक एकतेचा आदर्श घालून दिला. फटाक्यांच्या आतषबाजीने वातावरण अधिकच उत्साहपूर्ण झाले. या शोभायात्रेत महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग विशेष उल्लेखनीय ठरला. युवक-युवतींनी ढोल-ताशांच्या तालावर पारंपरिक वेशभूषेत नृत्य सादर करत जल्लोष वाढवला. राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनीही यात सहभाग घेत उत्सवात रंग भरला.

शोभायात्रा बाजार चौकातील मंदिरात पोहोचताच महाआरती करण्यात आली. त्यानंतर हजारो भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम शांततेत पार पडावा यासाठी ठाणेदार तुषार चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमाला काटोल विधानसभेचे आमदार चरणसिंग ठाकूर, माजी सभापती राजेंद्र हरणे, नरेश अरसडे, उकेश चव्हाण, काटोल विधानसभेचे काँगेसचे नेते याज्ञवल्क्य जिचकार, संदीप सरोदे, भाजपचे जिल्हा मंत्री दिलेश ठाकरे मोहन मातकर, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष अनिकेत अंनतुरकर, यांच्या सह परिसरातील हजारो रामभक्त उपस्थित होते.

# शेती, मका, ज्वारी उत्पादकांचा समावेश, महाराष्ट्र शेतकरी संघटनेच्या पाठपुराव्याला यश

### शेतकऱ्यांसाठी १३२.९३ कोटींचा निधी मंजूर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्रातील मका आणि ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांच्या थकीत देयकांचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय प्रवक्ते भूषण कुंटे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केलेल्या आक्रमक पाठपुराव्यामुळे शासनाने १३२.९३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. यामुळे राज्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

खरीप पण २०२४-२५ अंतर्गत मका आणि ज्वारीची विक्री केलेल्या ४७,००० हुन अधिक नोंदणीकृत शेतकऱ्यांचे थकीत पैसे प्रलंबित होते. या गंभीर प्रश्नावर भूषण कुंटे यांनी २३ जानेवारी रोजी ई-मेलद्वारे मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठपुरावा केला होता. आम्ही मिळवले हा शेतकऱ्यांचा हक्क असून प्रशासनिक दिरंगाईमुळे तो नाकारला जात होता, अशी परखड भूमिका त्यांनी मांडली होती. त्यांनी मांडले होते की, त्यांच्या या मागण्यांची दखल घेत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने २३ मार्च २०२६ रोजी अधिकृत पत्र काढून निधी वितरणाची माहिती दिली. प्रशासकीय पातळीवर झालेल्या या हालचालीमुळे आता शेतकऱ्यांच्या खात्यात थकीत रक्कम जमा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयाचे अनेक शेतकऱ्यांनी स्वागत केले असून संघटनेच्या पाठपुराव्याबद्दल त्यांनी आभारही मानले आहे.

**पैसे जमा होण्याची प्रक्रिया सुरू.....**

या निधीतून ३,२६,६६६ क्विंटल मका खरेदीसाठी २५४.५६ कोटी रुपये आणि १७,७८२ क्विंटल ज्वारीसाठी १७.८५ कोटी रुपये राज्य सहकारी महासंघ व आदिवासी विकास महामंडळाकडून प्रदान करण्यात आले आहेत. एकूण १३२.९३ कोटी रुपये आता संबंधित संस्थांना उपलब्ध झाले असून शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

**अन्यथा राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा....**

शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशासाठी आंदोलनाचा इशारा द्यावा लागतो हे दुर्दैवी आहे.१३२.९३ कोटी रुपये वितरित झाले असले तरी, त्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांना त्रास झाला. त्यांच्यावर कठोर कारवाई व्हायला हवी. येत्या ८ दिवसांत सर्व शेतकऱ्यांच्या खात्यात पूर्ण रक्कम जमा झाली नाही, तर राज्यव्यापी आंदोलन छेडले जाईल.

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अल्प मुदत कौशल्य विकास प्रशिक्षणाचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त,नागपूर :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अधिनस्त असलेल्या राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (कळक) व शासकीय तंत्र शिक्षण विद्यालयांमध्ये अल्पमुदत कौशल्य प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत फिटर फैब्रिकेशन, इलेक्ट्रिशियन, डिजिटल मित्र, सीएनसी ऑपरेटर आणि इलेक्ट्रिक व्हेईकल सर्विस टेक्निशियन यांसारख्या विविध रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. कौशल्य आत्मसात करण्यास इच्छुक तरुणासाठी हे प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रशिक्षणाचा कालावधी कोर्सनिहाय २०० ते ६०० ताम म्हणजेच साधारणतः तीन महिने असून उमेदवारांना दैनंदिन २ ते ६ तास प्रशिक्षण दिले जाईल. यासाठी शालेय किंवा महाविद्यालयीन स्तरावरील उत्तीर्ण विद्यार्थी, शिक्षण पूर्ण होऊ न शकलेले तरुण, तसेच मध्या नियमित शिक्षण घेत असलेले व व्यावसायिक कौशल्य आत्मसात करण्यास इच्छुक असणारे सर्व उमेदवार पात्र आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी https://forms.gle/AJYDCisMXWPB5oEh8 संकेतस्थळावर भेट देऊन आपली संपूर्ण माहिती भरावी आणि आपल्या पसंतीच्या कोर्ससाठी नोंदणी करून आपला प्रवेश निश्चित करावा. नोंदणी संदर्भात काही शंका किंवा तांत्रिक अडचण असल्यास उमेदवारांनी जवळील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेशी, शासकीय तंत्र शिक्षण विद्यालयाशी किंवा जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

# खैरगावात ग्रामपंचायत वादातून जीवघेणा हल्ला, तिघांना अटक

### माजी सरपंचाच्या पतीवर लोखंडी शस्त्र व दांडक्याने मारहाण, २९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील खैरगाव येथे ग्रामपंचायतच्या राजकारणातून सुरू असलेल्या वादाने हिंसक वळण घेत माजी सरपंचाच्या पतीवर जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना गुरुवारी (दि.२६) उघडकीस आली. या प्रकरणी नरखेड पोलिसांनी तातडीने कारवाई करत तीन आरोपींना अटक केली असून न्यायालयाने त्यांना २९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, खैरगाव येथील रवींद्र रामराव चौधरी (वय ४५) व राजेंद्र वानखेडे यांच्यात ग्रामपंचायत कारभारावरून मागील काही काळापासून वाद सुरू होता. गुरुवारी दुपारी खैरगाव बसस्थानकाजवळील चहा टपरीवर दोघांमध्ये झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर तीव्र वादात झाले.

यानंतर राजेंद्र वानखेडे हे मोवाड-जलालखेडा मार्गावरील जय बारमध्ये बसल्याची माहिती मिळताच रवींद्र चौधरी यांनी आपल्या साथीदारांसह तेथे धाव घेतली. त्यांनी लोखंडी नॉनचाकू व लाकडी दांडक्याने वानखेडे यांच्यावर अचानक हल्ला करून गंभीर मारहाण केली. या हल्ल्यात वानखेडे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर वरुड येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. घटनेची माहिती मिळताच नरखेड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

या प्रकरणी पोलिसांनी रवींद्र रामराव चौधरी (४५), जितेंद्र बाबुराव वानखेडे (४१) व कार्तिक चौधरी (२२, सर्व रा. खैरगाव) यांना अटक केली असून त्यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०९, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, फिर्यादी राजेंद्र वानखेडे यांच्या पत्नी रेणुका वानखेडे या २०१५ ते २०२० दरम्यान सरपंच होत्या, तर आरोपी रवींद्र चौधरी यांच्या पत्नी करुणा चौधरी या फेब्रुवारी २०२६ पर्यंत सरपंचपदी होत्या. त्या काळापासून ग्रामपंचायत कारभार, निधी वाटप व स्थानिक राजकारणावरून दोन्ही गटांमध्ये वाद सुरू असल्याची माहिती पुढे आली आहे. आरोपींना नरखेड येथील कनिष्ठ दिवाणी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना पुढील तपासासाठी २९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

उपविभागीय पोलीस अधिकारी पराग पोटे यांच्या मार्गदर्शनाखाली नरखेड पोलीस ठाण्याच्या ठाणेदार मंगला मोकाशे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन भांबुरकर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संजय इंगोले व दिनेश हिवसे पुढील तपास करीत आहेत.

थोडक्यात

## न्यू स्वराजनगर, बेसा येथे राम नामाचा गजर



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जय श्रीराम बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने बेसा-पिपळा मार्गावरील न्यू स्वराजनगर येथे रामनवमी उत्सव साजरा करण्यात आला. या उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आणि भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. माजी सरपंच किशोर वानखेडे यांच्या मार्गदर्शनात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष जयवंत सावळे, उपाध्यक्ष प्रवीण भोपळे, सचिव कुणाल दांडेकर, सहसचिव मुकुंद उपासने, सहसचिव दीपक रहांगडाले, कोषाध्यक्ष नानू परिहार, सहकोषाध्यक्ष महेंद्र तांबूलकर यांच्यासह मोहन तांबोरे, धीरज अग्निहोत्री, अनुप बेलसरे, संजय सावळे, ओम सावळे, रोहित वानखेडे, आतिश रहांगडाले, विजय चोपडे, उन्मेश परडकर, प्रवीण मडावी, राहुल वरुडकर, अनिरुद्ध मिसाळ, नरेश कचेवर, जागेश्वर उईके, किरण खैरीकर, अमित पाटील, मंगेश तुराणकर, लाला पांडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## अंबाझरी भार प्रेषण केंद्रात ६० किलोवॅटचा सौर प्रकल्प कार्यान्वित

### हरित ऊर्जेच्या दिशेने महापारेषणचे महत्त्वपूर्ण पाऊल



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शाश्वत ऊर्जा विकास आणि पर्यावरण संरक्षणाच्या उद्देशाने महापारेषणने एक मोठे पाऊल उचलले आहे. नागपूर येथील राज्य भार प्रेषण केंद्र, अंबाझरी येथे ६० किलोवॅट क्षमतेच्या अत्याधुनिक रूफटॉप सोलर यंत्रणेचे दिमाखदार सोहळ्यात उद्घाटन करण्यात आले. या प्रकल्पामुळे भार प्रेषण केंद्राच्या वीज वापरामध्ये अक्षय ऊर्जेचा वाटा वाढणार असून, कार्बन उत्सर्जनात मोठी घट होण्यास मदत होणार आहे. या विशेष कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे कार्यकारी संचालक शशांक जेवळीकर यांनी भूषविले. त्यांच्या हस्ते आणि महापारेषण नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता सतीश अणे, महावितरण नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या शुभहस्ते या सौर प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी महाऊर्जा नागपूरचे विभागीय महाव्यवस्थापक सारंग महाजन आणि राज्य भार प्रेषण केंद्राचे मुख्य अभियंता गिरीश पंतोजी यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करताना शशांक जेवळीकर म्हणाले की, "वाढती ऊर्जेची मागणी आणि पर्यावरणीय आव्हाने लक्षात घेता अक्षय ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर करणे ही काळाची गरज आहे. सौर प्रकल्पांच्या वाढत्या विस्तारामुळे ग्रीड व्यवस्थापनात नवीन तांत्रिक आव्हाने उभी राहत आहेत. त्यामुळे ऊर्जा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी विविध तांत्रिक बाबींचा सखोल अभ्यास करणे आणि आधुनिक प्रणालींचा अवलंब करणे आवश्यक आहे." महावितरणचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी यावेळी नमूद केले की, सौर ऊर्जेचे योग्य व्यवस्थापन आणि पारेषण करण्यासाठी राज्यातील वीज वितरण प्रणाली अधिक सक्षम आणि लवचिक करणे गरजेचे आहे. महावितरण या बदलांसाठी पूर्णपणे सज्ज असून, ग्राहकांना अखंडित आणि स्वच्छ ऊर्जा देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. महापारेषणचे मुख्य अभियंता सतीश अणे यांनी या प्रकल्पाचे कौतुक करताना सांगितले की, अंबाझरी केंद्राचा हा पुढाकार हरित ऊर्जेच्या जागतिक मोहिमेला बळ देणारा ठरेल.

महाऊर्जाचे विभागीय महाव्यवस्थापक सारंग महाजन यांनी महाराष्ट्र सरकारच्या सौर ऊर्जा धोरणावर प्रकाश टाकला. राज्याची सौर ऊर्जेची निर्धारित उद्दिष्ट्ये वेळेत पूर्ण करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करत असून, उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा वापर करून ऊर्जा स्वावलंबित्व मिळवण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी अंबाझरी भार प्रेषण केंद्राच्या अधीक्षक अभियंता वैशाली पाझारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी अभियंता निरंजन दलाल, किशोर जोधे आणि अक्षय बागडे यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला विभागातील सर्व वरिष्ठ अभियंता, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ६० किलोवॅटच्या या प्रकल्पामुळे आता अंबाझरी कार्यालय सौर ऊर्जेचा वापर करणार असल्याने वीज बिलातही मोठी बचत होणार आहे.

## शशिकला दामोदर लिमजे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**



जनता विद्यालय मौदा येथील माजी उप मुख्याध्यापक दामोदर लिमजे यांच्या पत्नी तसेच कार्यरत शिक्षक पराग लिमजे यांच्या मातोश्री शशिकला दामोदर लिमजे यांचे २७ मार्च २०२६ ला दुपारी अकस्मात निधन झाले. आज सकाळी दहा वाजता मौदा येथील समशान घाटावर त्यांचे अंत्यसंस्कार पार पडणार आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली आणि नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# लोकधारा आणि देशभक्तीचा अप्रतिम मिलाफ

## 'माटी हमारा वंदन...'मध्ये संगीत-नृत्याचा सुंदर संगम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यावतीने आयोजित व कलासंगम, कला व सांस्कृतिक मंडळ आणि केशवनगर सांस्कृतिक सभा प्रस्तुत माटी हमारा वंदन..! हा देशभक्तीपर आणि लोकधारेच्या गीत संगमातून साकारलेला संगीत-नृत्याचा कार्यक्रम चांगलाच रंगला.



माटी हमारा वंदन..! हा कार्यक्रम शुक्रवारी शंकरनगर येथील साई सभागृहामध्ये पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्याचे अधिकारी वसंत खडसे व रूपेश गायधणे, जेष्ठ साहित्यिक प्रकाश एदलाबादकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलाने झाली.

या कार्यक्रमात नागपूरमधील सुमारे २०० प्रसिद्ध गायक, वादक आणि नृत्यनाट्य कलाकार सहभागी होते. देशभक्ती आणि भारतीय लोकसंस्कृतीचा अनोखा आविष्कार रसिकांना अनुभवायला मिळाला. प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गाण्यांनी व नाट्यनृत्याने रसिक मंत्रमुग्ध झाले.

यावेळी गायक अमर कुळकर्णी, मुकुल पांडे, अक्षय चारभाई, अमेय वैद्य, मंजिरी वैद्य, सायली मास्टे, भाग्यश्री बारस्कर, आकांक्षा चारभाई यांनी हिंदुस्तान की कहानी, वंदे मातरम, शिवतांडव, रामायण, यदा यदा हि, बुद्धमं शरणमं गच्छामि, नमो नमो शंकरा, पंजाबी गिद्दा, मोती वेराणा, म्हारो हेलो, चाणक्य, हम करे राष्ट्र आराधन, दिंडी, विठुचा गजर, माऊली माऊली, रंग दे बसंती चोला, आई भवानी, लल्लाटी, अफझल खानवध पोवाडा, ये देश है वीर, मंगल मंगल, जयोस्तुते, डॉ. हेडगेवार, जननी जन्मभूमी, डॉ. आंबेडकर, भारतीय घटनेचा, नांदी, गाऊ नको रे कृष्णा, आमी ठाकर, सुनो गौर से, शिवराज्यभिषेक, अरुणोदय झाला, मेरे घर राम, मेरे भारत का बच्चा, मिले सुर मेरा तुम्हारा, माटी हमारा वंदन, यासारखी गीते सादर केली. यांना सहाय्यक गायक म्हणून सचिन कोल्हारकर, यशवंत रानडे, वेदांत दांडेकर, वरुण व्यवहारे, फाल्गुनी खटी, देविका मार्डीकर, रेणुका कोल्हारकर उत्तमरीत्या साथ दिली. यावेळी वाद्यवृंदावर गोविंद गडीकर, अमर शेंडे, प्रवीण लिहितकर, गौरव टांकसाळे, पंकज यादव, नंदू गोहणे, विशाल दहासहस्त्र, विक्रम जोशी यांनी साथसंगत केली.

नाट्य दिग्दर्शन सारंग मास्टे, अभिषेक बेल्लारवार, दीपाली घोंगे व त्यांच्या चमूने केले, तर नृत्य दिग्दर्शन श्रीकांत धबडगावकर व त्यांच्या चमूने सादर केले. ध्वनी व्यवस्था संदीप बारस्कर, प्रकाश योजना सुनील बोंबले, नेपथ्य राजेश अमीन, व्हिडिओ व्यवस्थापन मनोज पीदडी यांनी सांभाळले. विशेष सहाय्य आशुतोष अडोणी यांचे होते, तर कार्यक्रमाचे समन्वयक गजानन रानडे होते.

**आजपासून रामस्मरण व्याख्यानमाला**

रामस्मरण व्याख्यानमाला २८ ते ३० मार्च २०२६ दरम्यान सायंकाळी ६.३० वाजता महर्षी व्यास सभागृह, डॉ. हेडगेवार स्मारक परिसर, रेशीमबाग येथे आयोजित करण्यात आली आहे. आज २८ तारखेला सुप्रसिद्ध प्रवचनकार विवेक घळसासी यांचे रामायणातील भेटीगाठी विषयावर व्याख्यान होणार असून अध्यक्षस्थानी म.न.पा. नागपूरचे सांस्कृतिक व क्रीडा अधिकारी पियूष आंबुलकर राहतील.

२९ मार्च रोजी सुप्रसिद्ध अभिनेते व वक्ते शरद पोंक्षे यांचे भारत एक हिंदुराष्ट्र विषयावर व्याख्यान होईल. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्थायी समिती अध्यक्षा शिवानी दाणी-वखरे भूषवतील.

३० मार्च रोजी सुप्रसिद्ध प्रवचनकार श्रीनिवास पेंडसे मृत्युंजय छत्रपती विषयावर आपले विचार व्यक्त करतील. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील.

## आरटीई २५ टक्के प्रवेश प्रकिया २०२६-२७ ऑनलाईन अर्ज प्रकियेसाठी ३१ मार्चपर्यंत पर्यंत मुदतवाढ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आरटीई २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतंर्गत सन २०२६-२७ करिता अर्ज सादर करण्यासाठी अंतराचे निकषात बदल करण्यात आला आहे, तसेच पालकांना ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी दिनांक ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी अर्ज भरण्यासाठी असलेली एक किलोमीटरची अट रद्द करण्यात आलेली आहे. त्यामुळे ज्या पालकांनी १ किलोमीटरच्या आत असलेल्या शाळांची निवड करून फॉर्म सबमिट केला आहे, तसेच ज्या पालकांनी / विद्यार्थ्यांनी आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी नोंदणी केली आहे. त्यांना आता प्रवेशासाठी १ किमी, १ ते ३ किमी तसेच ३ किमी पेक्षा अधिक अंतरावरील शाळा उपलब्ध झाल्या आहेत. या अनुषंगाने संबंधित पालकांना पालक लॉगिनमध्ये अनकन्फर्म करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे सर्व संबंधितांनी आपला सादर केलेला फॉर्म अनकन्फर्म करून आवश्यक ती सुधारित माहिती नोंदवावी.

**पालकांसाठी सूचना**

पालकांनी अर्ज भरताना आपल्या राहत्या निवासाचा पूर्ण पत्ता आणि Google Location पुन्हा पुन्हा तपासून पाहावे. पूर्ण अर्ज बरोबर असल्याची खात्री झाल्या शिवाय अर्ज सबमिट करू नये. आपल्या बालकाचा अर्ज भरत असताना जन्म दाखल्या वरीलच जन्म दिनांक लिहावा. एकदा भरलेली जन्म तारीख पुन्हा बदलता येणार नाही. प्रवेश पात्रतेसाठी आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे फॉर्म सबमिट करताना अपलोड करणे आवश्यक आहे.

अर्ज भरत असताना आवश्यक कागदपत्र पालकांनी तयार ठेवावेत. लॉटरी लागली आणि कागदपत्र नसतील तर प्रवेश रद्द होऊ शकतो याची नोंद घ्यावी.अर्ज भरून झाल्यावर जर तो चुकला आहे असे समजले तर पहिला अर्ज सबमिट करण्यापूर्वी डिलीट करावा आणि नवीन अर्ज भरावा. एका पालकाने आपल्या बालकासाठी डुप्लिकेट अर्ज भरू नये. एकाच बालकाचे २ अर्ज आढळून आल्यास त्या बालकाचे दोन्ही अर्ज बाद होतील व ते अर्ज लॉटरी प्रक्रियेमध्ये समाविष्ट केले जाणार नाहीत. अर्ज भरल्यावर पालकांनी अर्ज क्रमांक, अर्जात लिहिलेला मोबाइल नंबर आणि अर्जाची प्रत स्वतः जवळ लॉटरी प्रक्रिया होईपर्यंत जपून ठेवावी.अर्ज भरत असताना अर्जातील माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यास मिळालेला प्रवेश रद्द होईल. अर्ज करताना पासवर्ड विसरल्यास तो फीॅङ्क५ी१ ढं२२६ङ्क१ि यावर क्लिक करून रिसेट करावा. फळए 25 % प्रवेश २०२६-२०२७ या वर्षाकरिता पालकांनी अर्ज भरण्याची मुदत दि. ३१ मार्चपर्यंत राहील. दिव्यांग बालकांना अर्ज करण्यासाठी दिव्यांगत्वाचे प्रमाण पत्र ४० टक्के आणि त्या पुढील ग्राह्य धरण्यात येईल. सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता निवासी पुरावा म्हणून गॅस बुक रद्द करण्यात येत आहे. सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता निवासी पुरावा म्हणून बँकेचे पासबूक दिल्यास फक्त राष्ट्रीय कृत बँकेचेच पासबुक ग्राह्य धरण्यात येणार आहे.अर्ज भरताना location चुकू नये म्हणून Google Map वर पत्ता टाकून मिळालेले Lattitude, Longitude प्रवेश अर्जावर टाकल्यास location चुकणार नाही. अर्ज प्रकिया, अर्ज कालावधी, आवश्यक कागदपत्रांचा तपशील याबाबतच्या सुधारीत सूचना व इतर माहितीसाठी पालकांनी https://student.maharashtra.gov.in/adm या संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी निखिल भुयार यांनी केले आहे.

## वीजदर कपातीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार

### विश्वास पाठक यांची प्रतिक्रिया

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महावितरणतर्फे राज्यात होणाऱ्या वीज पुरवठ्याच्या संदर्भात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने बहुवार्षिक वीजदर आदेश दिला असून त्यामध्ये महावितरणच्या वीजदर कपातीच्या प्रस्तावावर शिक्कामोर्तब झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यातील घरगुती, औद्योगिक व वाणिज्यिक अशा सर्व वीज ग्राहकांसाठी २०३० पर्यंत सलग पाच वर्षे टप्प्या टप्प्याने वीजदरात कपात होणार असून त्याबद्दल आपण मा. मुख्यमंत्र्यांचे आभार व्यक्त करतो, अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टीचे प्रदेश प्रवक्ता व महावितरणचे स्वतंत्र संचालक मा. विश्वास पाठक यांनी व्यक्त केली.



ते म्हणाले की, गेले वर्षभर याबाबत आयोग, उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाच्या पातळीवर विविध सुनावण्या झाल्या. आता संपूर्ण वैधानिक प्रक्रिया पूर्ण करून आयोगाकडून आदेश आल्यामुळे स्पष्टता व निश्चितता आली आहे. त्यांनी सांगितले की, मा. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत असून वीजदर कपातीच्या आदेशामुळे राज्याच्या आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे.

कोणत्याही घटकातील वीज ग्राहकांसाठीच्या वीजदरात पाच वर्षे वाढ होणार नाही तर कपातच होणार आहे, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे, असेही ते म्हणाले. महिना शंभर युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी पाच वर्षात २६ टक्के इतकी मोठी वीजदर कपात होणार आहे. एकूण घरगुती वीज ग्राहकांमध्ये या गटातील ग्राहकांचे प्रमाण ७० टक्के आहे. महिना १०० ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठीच्या वीजदरातही पाच वर्षात पाच टक्के इतकी कपात होणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

त्यांनी सांगितले की, आयोगाने आर्थिक वर्ष २०२६ ते २०३० असा पाच वर्षांचा आदेश दिला आहे. त्यामध्ये आता आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश करत असल्याने वीज ग्राहकांना आदेशातील दुसऱ्या वर्षाचा दर लागू होईल म्हणजेच त्यांना अधिक सवलत मिळेल. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत ( म्हणजे सोलर अवर्समध्ये) वापरलेल्या वीजेसाठीची सवलत आता प्रती युनिट ८ ८५ होईल. त्याच प्रमाणे शंभर युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठीचा सरासरी दर आता ७ रुपये १० पैसे होईल. शंभर ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठीचा सरासरी दर १२ रुपये ९४ पैसे होईल. औद्योगिक ग्राहकांचाही दर आणखी कमी होईल. आयोगाने या आदेशात विद्युत वाहनांच्या चार्जिंग स्टेशनसाठीचा वीजदर स्पष्टपणे दिला आहे. हा दर महावितरणच्या कृषी वगळता सरासरी पुरवठा दरापेक्षा कमी ठेवला आहे. उच्चदाब व लघुदाब विद्युत वाहन चार्जिंग स्टेशनसाठी आता प्रती युनिट ९ रुपये ५० पैसे इतका दर असेल. २०३० पर्यंत हा दर जवळजवळ स्थिर राहणार असल्याने विद्युत वाहनांच्या वापराला प्रोत्साहन मिळेल, असे विश्वास पाठक म्हणाले.

## तीन दिवसीय 'भारत फोटो फेअर २०२६' चे थाटात उद्घाटन

### प्रदर्शनीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कॅव्होक सर्विसेसच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य 'भारत फोटो फेअर २०२६' या प्रदर्शनीचे उद्घाटन आज शुक्रवारी मोठ्या उत्साहात पार पडले. विठोबाचे संचालक कार्तिक शेंडे व प्रसिद्ध फोटोग्राफर विनय ठाकूर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून या फोटो फेअरची सुरुवात करण्यात आली.



नक्षत्रा बॅन्क्वेट, एम्प्रेस मॉल, नागपूर येथे झालेल्या या कार्यक्रमाला कॅव्होक सर्विसेसचे संचालक सुमीत जैन, ऑरेंज सिटी फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष महेश काळबांडे, इमिजिएट पास्ट प्रेसिडेंट गजानन रानडे, फोटोग्राफर असोसिएशन ऑफ नागपूरचे अध्यक्ष आनंद निर्भवणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना कार्तिक शेंडे यांनी सांगितले की, आजच्या डिजिटल युगात फोटोग्राफी हे केवळ छंद न राहता एक मोठे व्यावसायिक क्षेत्र बनले आहे. नवीन तंत्रज्ञान, आधुनिक उपकरणे आणि सर्जनशील दृष्टिकोन यांचा संगम साधत तरुणांना या क्षेत्रात मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. भारत फोटो फेअर २०२६ सारख्या व्यासपीठामुळे फोटोग्राफर्सना नवीन ट्रेंड्स, तंत्रज्ञान आणि उद्योगातील घडामोडी जाणून घेण्यासोबतच नेटवर्किंगची संधी मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

दुपारी फोटोग्राफी - राईट इक्विपमेंट - बिझनेस डेव्हलपमेंट अँड मोअर या विषयावर टॉक शो पार पडला. यात मानसी ठक्कर, जयंत पेडणेकर, विनोद देशपांडे व संगीता महाजन या प्रख्यात फोटोग्राफर्सनी आपले विचार मांडले.

फेअरच्या पहिल्याच दिवशी महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, छत्तीसगढ, तेलगंणा येथून आलेल्या प्रतिनिधींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हे प्रदर्शन २९ मार्चपर्यतं सकाळी ११ ते सायंकाळी ६ या वेळेत सर्वांसाठी खुले राहणार असून कार्यशाळा, स्पर्धा, फॅशन शो, मॉडेल शूट आणि पुरस्कार आदी कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे.